दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४१ | बुधवार दि.२९ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### उष्णतेच्या लाटा:इशारा की आपत्तीची चाहूल?

फेब्रुवारी ते मे हा कालावधी परंपरेने उन्हाळ्याचा मानला जातो; मात्र यंदाच्या उन्हाळ्याने ''सामान्य'' या शब्दालाच हरवून टाकले आहे. फेब्रुवारी आणि मार्च काही प्रमाणात सुसह्य गेले असले तरी एप्रिल महिन्याने अक्षरशः अंगावर येत नागरिकांना हैराण केले. उत्तर भारतातील परिस्थिती भटारखान्यासारखी झाल्याची उपमा उगाच नाही. उष्णतेच्या लाटांनी जनजीवन विस्कळीत केले असून, त्याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रासह देशभर उमटताना दिसत आहेत.

# सरकारला अजून किती बळी हवेत?

## विजय वडेट्टीवार यांचा संतप्त सवाल; मराठवाड्यात ३ महिन्यांत २१७ शेतकरी आत्महत्या

मुंबई । प्रतिनिधी

**शेतकरी आत्महत्यांच्या प्रश्नावरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. मराठवाड्यात अवघ्या तीन महिन्यांत २१७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. सरकारला अजून किती बळी हवेत? असा सवाल वडेट्टीवार यांनी सरकारला विचारला आहे.**



या संदर्भात सोशल मीडियावरील पोस्टमध्ये वडेट्टीवार यांनी लिहिले की, मराठवाड्यात अवघ्या तीन महिन्यांत २१७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. कर्जाचा बोजा आणि उद्ध्वस्त झालेल्या पिकांमुळे बळिराजा हतबल झाला आहे. रक्ताचे पाणी करून जगाला पोसणारा अन्नदाता आज स्वत:च्याच शेतात फासावर लटकतो, ही सर्वांत मोठी शोकांतिका आहे. सरकारच्या मदतीच्या घोषणा आणि योजना फक्त कागदावरच नाचत आहेत, पण शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचायला यांना मुहूर्त मिळत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यात हे सरकार पूर्णपणे निकामी ठरले आहे. अशा सरकारचा आम्ही जाहीर निषेध करतो, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे. सरकारचे धोरण ग्राहकाभिमुख असल्याने शेतमालाला योग्य दर मिळत नाही, असा आरोप होत आहे. कांदा, कापूस, डाळी यांसारख्या पिकांना योग्य हमीभाव मिळत नसताना आयात

▶▶ पान २ वर

### सरकारसमोर कठीण प्रश्न

शेतकरी आत्महत्यांचा वाढता आकडा हा केवळ आकडेवारी नसून, ग्रामीण भागातील वेदनेचा आवाज आहे. तात्पुरत्या मदतीऐवजी ठोस कर्जमुक्ती, हमीभाव, शेती विमा आणि त्वरित नुकसानभरपाईची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही, तर ही भीषण साखळी थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. शेतकऱ्याचे उत्पन्न घटत असताना खते, कीटकनाशकांचा खर्च वाढत आहे. हमीभाव मिळत नाही, तर सरकारच्या आयात-निर्यात धोरणांमुळे बाजारभाव कोसळतो. या चुकीच्या निर्णयांमुळेच शेतकरी आत्महत्येकडे वळतो.

## थोडक्यात...

### भारतीय विमान वाहतूक उद्योग कोलमडणार?

नवी दिल्लीः पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीचा मोठा फटका भारतातील विमान वाहतूक सेवेला बसला आहे. हा उद्योग सध्या प्रचंड तणावाखाली असून, तो बंद पडण्याच्या किंवा कामकाज थांबवण्याच्या उंबरठ्यावर आहे.'' हा गंभीर इशारा फेडरेशन ऑफ इंडियन एअरलाईन्स (एफआयए) ने दिला आहे. एअर इंडिया, इंडिगो आणि स्पाइसजेट यांसारख्या प्रमुख कंपन्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एफआयएने सरकारला तात्काळ मदत मागितली असून, विमान इंधनाच्या किमतींबाबत तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.
देशातील महत्त्वाच्या विधानसभा निवडणुका सुरू असताना, सरकारने एप्रिल महिन्यासाठी देशांतर्गत विमान इंधनाच्या मूळ किमतीतील वाढ २५ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवली होती. मात्र, आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणांसाठी ही वाढ १०० टक्क्यांहून अधिक करण्यात आली. आता मे महिन्यासाठी किमतींचा मासिक आढावा या आठवड्याच्या शेवटी घेतला जाणार आहे.


### आता देशात 'वंदे भारत कार्गो' धावणार

नवी दिल्लीः भारतीय रेल्वेची वंदे भारत संकल्पना प्रचंड सुपरहिट झाली आहे. वंदे भारत ट्रेन भारतीय रेल्वेचा एक नवीन ब्रँड म्हणून उदयास आली आहे. वंदे भारत ट्रेनची सेवा देशभरात सुमारे १६४ मार्गांवर सुरू आहे. वंदे भारत ट्रेन प्रवाशांना हाय-स्पीड कनेक्टिव्हिटी, सुरक्षा व आलिशान सुविधा पुरवते. वंदे भारत चेअर कार, वंदे भारत स्लीपर या सेवा सुरू असून, वंदे भारत मेट्रोचाही विस्तार करण्याचा मानस रेल्वेचा आहे. यासह आता वंदे भारत कार्गो म्हणजे मालवाहतूक करण्यासाठी वंदे भारत संकल्पनेची मदत घेतली जात आहे. भारतीय रेल्वेने वंदे भारत कार्गो या ट्रेनचे प्रोटोटाइप तयार केले असून याच्या चाचणीला सुरुवात झाल्याचे म्हटले जात आहे. वंदे भारत कार्गो ट्रेनची चाचणी यशस्वी झाल्यास भारतीय रेल्वेत मालवाहतुकीचा एक नवीन अध्याय सुरू होईल. गेल्या काही वर्षांपासून भारतीय रेल्वेने मालवाहतुकीकडे अधिक लक्ष केंद्रीत केले आहे.
मालवाहतुकीसाठी विशेष मार्गही सुरू करण्यात आले आहेत. याचा प्रचंड मोठा फायदा रेल्वेला गेल्या काही वर्षांत झालेला आहे. याचाच एक भाग म्हणून आता भारतीय रेल्वे वंदे भारत कार्गो सेवेत आणली जाणार आहे.

### अंबानी यांची ३,०३४ कोटी रूपयांची मालमत्ता जप्त

मुंबईः सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) मोठी कारवाई केली. त्यानुसार, उद्योगपती अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि इतर कंपनीशी संबंधित ३,०३४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे रिलायन्स अनिल अंबानी समूहाच्या (आरएएजी) अडचणीत मोठी वाढ झाली असून, आतापर्यंत जप्त करण्यात आलेल्या एकूण मालमत्तेचा आकडा १९,३४४ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. जप्त करण्यात आलेल्या या मालमत्ता रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आर-इन्फ्रा) यांच्याशी संबंधित आहेत. यामध्ये मुंबईतील एक आलिशान फ्लॅट, खंडाळ्यातील एक फार्महाऊस, महाराष्ट्रातील एका हिल स्टेशनवरील मालमत्ता, अहमदाबादमधील साणंद येथील जमिनीचे भूखंड आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे ७.७१ कोटी शेअर्स यांचा समावेश आहे. ईडीने या मालमत्तांच्या जप्तीसाठी तात्पुरता आदेश जारी केला आहे.

# १३० व्या घटना दुरुस्ती विधेयकाबाबत संयुक्त संसदीय समितीचा महाराष्ट्रात अभ्यास दौरा




## मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह गृह आणि विधि व न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत घेतली बैठक

मुंबई । प्रतिनिधी

संविधान (१३० वी दुरुस्ती) विधेयक २०२५ तसेच जम्मू-कश्मीर पुनर्गठन (दुरुस्ती) विधेयक २०२५ आणि केंद्रशासित प्रदेश शासन (दुरुस्ती) विधेयक २०२५ संदर्भात मते जाणून घेण्यासाठी संयुक्त संसदीय समिती २७ व २८ या दोन दिवसांसाठी महाराष्ट्र राज्याच्या अभ्यास दौऱ्यावर आली आहे. समितीने यासंदर्भात विविध घटकाशी संवाद साधला.

▶▶ पान २ वर

# खा.सोनवणेंच्या गाडीला अपघात दुचाकीस्वार गंभीर

बीड । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या कारला मंगळवारी अपघात झाला. त्यांच्या कारला दुचाकीने मागून जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामध्ये कारचेही नुकसान झाले आहे. राष्ट्रवादीचे खासदार बजरंग सोनवणे हे केजकडे जात असताना,त्यांच्या कारला एका दुचाकीने पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत बजरंग सोनवणे


▶▶ पान २ वर

# विधानपरिषदेसाठी भाजपाकडून नव्या चहऱ्यांना संधी

## पाच नावे जाहिर: नगरमधुन शंकरराव कोल्हेच्या नातवाला संधी

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचं लक्ष लागलेल्या विधानपरिषद निवडणुकांच्या उमेदवारांपैकी पहिल्यांदा भाजपकडून ५ नावांची घोषणा झाली आहे. भाजपच्या संसदीय कमिटीच्या मान्यतेनंतर भाजपने अधिकृतपणे महाराष्ट्रातील ५ विधानपरिषदांच्या जागेसाठी पाच नावांची घोषणा केली. त्यामध्ये, काँग्रेसमधून भाजपात आलेल्या प्रज्ञा सातव यांना पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी देण्यात



आली आहे. तर, अहिल्यानगरमधील विवेक कोल्हेंना संधी विधानपरिषदेची संधी मिळाली आहे. सुनिल कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. विवेक कोल्हे यांचं नाव निश्चित झाल्याच्या कालपासून चर्चा सुरु होत्या. विवेक कोल्हे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. प्रमोद जठार हे सिंधुदुर्गमधील भाजप नेते असून त्यांना भाजपकडून संधी देण्यात आली आहे.

भाजपने जाहीर केलेल्या ५ नावांमध्ये माधवी नाईक यांचंही नाव असून ते अनेक वर्षांपासून भाजप संघटनेत काम करतात. तर, संजय भेंडे भाजपचे उपाध्यक्ष असून ते नागपूर भाजपचे

▶▶ पान २ वर

# १ मे पासून मराठी सक्तीची मोहीम, मात्र कारवाई नाही

मुंबई । प्रतिनिधी

रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर मराठी भाषा सक्तीसाठी कारवाई करणार नाही, पण त्यांना मराठी आलीच पाहिजे, यासाठी आमची मोहीम सुरू राहील. मराठी शिकण्यासाठी १०० दिवसांची मुदतवाढ देण्यात आली असून, परवाना रद्द होणार नाही, असे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी (दि. २८) स्पष्ट केले. आरटीओ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, ''रिक्षा-टॅक्सी संघटना प्रतिनिधींची काल बैठक पार पडली.

▶▶ पान २ वर

# कर्मचाऱ्यांच्या पगारापेक्षा 'एआय'चा खर्च दुप्पट

नवी दिल्ली । प्रतिनिधी

अनेक आघाडीच्या कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून एआयवर पैसा लावत आहेत. परंतू, एआयने हळूहळू आता रंग दाखवायला सुरुवात केली असून, कर्मचारी परवडले पण एआय नको असे म्हणायची वेळ या कंपन्यांवर आली आहे.

एआय मॉडेल ट्रेन करणे आणि ते चालवणे आता इतके महाग झाले आहे की, अनेक कंपन्यांचे एआय बील त्यांच्या मनुष्यबळाच्या खर्चाला मागे टाकत आहे. गार्टनरच्या अंदाजानुसार, २०२६ मध्ये जागतिक आयटी खर्च ६.३१ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचू शकतो, जो २०२५ च्या तुलनेत १३.५% जास्त आहे. उबेरचे प्रवीण नेपल्ली नागा यांनी उघड केले की, त्यांच्या कंपनीने २०२६ चे संपूर्ण एआय बजेट केवळ काही महिन्यांतच


▶▶ पान २ वर

# डिजिटल अरेस्ट: ९,४०० व्हॉट्सअॅप अकाउंटवर बंदी

## केंद्र सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात अहवाल सादर

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशातील वाढत्या डिजिटल अरेस्ट प्रकरणांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने मोठी कारवाई सुरू केली आहे. जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत सायबर गुन्ह्यांत सहभाग आढळलेल्या ९ हजार ४०० खात्यांवर व्हॉट्सअॅपने बंदी घालण्यात आली आहे. या कारवाईत दूरसंचार नियामक, सेवा प्रदाते, आरबीआय, तंत्रज्ञान




कंपन्या आणि सीबीआय यांसारख्या अनेक संस्था एकत्रितपणे काम करत आहेत. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात ही माहिती दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर गृह मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या इंडियन सायबरक्राईम कोऑर्डिनेशन सेंटरने एक सविस्तर अहवाल दाखल केला आहे. डिजिटल अरेस्टसारख्या ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी विविध स्तरांवर पावले उचलली जात असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. सरन्यायाधीश

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२८ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०३.०० क्विंटल | १,९०० | ३,०२६ | २,३२५ |
| ज्वारी/हायब्रिड: १३०.०० क्विंटल | १,५०० | ५,१०० | २,३७५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८.५० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ७६.०० क्विंटल | २,१५० | २,५०० | २,३३२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,९०१ | ५,१९० | ५,०४७ |



## अग्रलेख

# उष्णतेच्या लाटा : इशारा की आपत्तीची चाहूल?

फेब्रुवारी ते मे हा कालावधी परंपरेने उन्हाळ्याचा मानला जातो; मात्र यंदाच्या उन्हाळ्याने ''सामान्य'' या शब्दालाच हरवून टाकले आहे. फेब्रुवारी आणि मार्च काही प्रमाणात सुसह्य गेले असले तरी एप्रिल महिन्याने अक्षरशः अंगावर येत नागरिकांना हैराण केले. उत्तर भारतातील परिस्थिती भटारखान्यासारखी झाल्याची उपमा उगाच नाही. उष्णतेच्या लाटांनी जनजीवन विस्कळीत केले असून, त्याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रासह देशभर उमटताना दिसत आहेत. विदर्भ आणि मराठवाडा या भागांना दरवर्षी उष्णतेचा तडाखा बसतोच; पण यंदा राज्यातील अर्ध्याहून अधिक भाग होरपळून निघत असल्याचे चित्र आहे. तब्बल २२ शहरांमध्ये तापमान चाळीशीपार गेले, ही बाबच परिस्थितीची गंभीरता अधोरेखित करते.

उष्णतेच्या लाटांमुळे केवळ अस्वस्थता निर्माण होत नाही, तर त्याचे परिणाम थेट मानवी आरोग्यावर आणि जीवितावरही होत आहेत. उष्माघाताने बळी जाण्याच्या घटना समोर येत आहेत, ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक ठरते. पुरेसे पाणी पिणे, उन्हात अनावश्यक वावर टाळणे, हलका आहार घेणे, शरीराला थंड ठेवण्याचे उपाय करणेया साध्या वाटणाऱ्या गोष्टी आज जीवनरक्षक ठरत आहेत. मात्र, या उष्णतेच्या लाटांचा परिणाम केवळ शहरांपुरता मर्यादित नाही. शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेने आणि जागतिक हवामान संघटनेने प्रसिद्ध केलेला अहवाल अत्यंत धक्कादायक आहे. या अहवालानुसार, उष्णतेच्या लाटांमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात शेतीचे मोठे नुकसान होत आहे. २०२२ मध्ये गव्हाच्या उत्पादनात ९ ते ३४ टक्क्यांपर्यंत घट झाली, तर दुग्धोत्पादनातही १५ टक्क्यांपर्यंत घट नोंदवली गेली. टोमॅटो, फ्लॉवर, आंबा यांसारख्या पिकांवर विपरीत परिणाम झाला असून कुक्कुटपालनातही मृत्यूदर वाढला आहे. ही सर्व चिन्हे कृषी व्यवस्थेतील असंतुलनाची स्पष्ट सूचना देत आहेत. उष्णतेमुळे बाष्पीभवन वाढते, जमिनीतील ओलावा कमी होतो आणि परिणामी दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होते. त्यातच 'एल निनो'चा प्रभाव आणि हवामानातील अस्थिरता यामुळे भविष्यातील संकट अधिकच गडद होत आहे. भारतातील सुमारे ६० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्याने या संकटाचे परिणाम व्यापक असणार आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अंदाजानुसार, या शतकाच्या अखेरीस हवामानातील बदलांमुळे शेतीमधील कामगारांची कार्यक्षमता ४० टक्क्यांपर्यंत घटू शकते. उष्णता आणि आर्द्रतेच्या संयुक्त परिणामामुळे कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होईलच; शिवाय मजुरांची टंचाईही भासू शकते. या पार्श्वभूमीवर, शेती आणि कृषी अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी आता तातडीने बदल स्वीकारण्याची गरज आहे. पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहणे आता परवडणारे नाही. उष्णतेला तोंड देणारी बियाणे, सूक्ष्म सिंचन पद्धती, पाणी बचत तंत्रज्ञान, हवामानाच्या अचूक अंदाजावर आधारित शेती नियोजनया उपाययोजना केवळ पर्याय नसून आवश्यकता बनल्या आहेत. तसेच शेतमजुरांसाठी सुरक्षित कामाचे तास, पशुधनासाठी सावली आणि पाण्याची व्यवस्था, स्थानिक पातळीवर हवामानाशी सुसंगत नियोजन यावर भर देणे अत्यावश्यक आहे. याचबरोबर, जागतिक स्तरावरही या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. सध्या पृथ्वीचे तापमान सुमारे १.४८ अंशांनी वाढले आहे, आणि हा वेग अभूतपूर्व आहे. पॅरिस हवामान करारानुसार कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सर्व देशांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु वास्तवात जागतिक राजकारणातील संघर्ष, युद्धाची मानसिकता आणि आर्थिक स्पर्धा यामुळे पर्यावरणाच्या प्रश्नाकडे दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जाते.

उष्णतेच्या लाटा हा केवळ ऋतूतील बदल नसून येणाऱ्या मोठ्या पर्यावरणीय आपत्तीचा इशारा आहे. आज जर आपण सजगपणे उपाययोजना केल्या नाहीत, तर उद्याचा काळ अधिक भयावह असणार आहे. म्हणूनच सरकार, शास्त्रज्ञ, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकसर्वांनी मिळून हवामान बदलाच्या या संकटाला सामोरे जाण्याची तयारी आतापासूनच करावी लागेल. अन्यथा, उष्णतेच्या या लाटा पुढील काळात जीवनाच्या प्रत्येक अंगाला ग्रासतील, यात शंका नाही.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा राज्यस्तरीय सन्मान



**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात पार पडलेल्या सोहळ्यात राज्यस्तरीय विशेष सन्मान करण्यात आला आहे.**

मा.जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांना २८ एप्रिल २०२६ रोजी मा.मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग व मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते पुरस्कार देण्यात आला. जालना जिल्हा जिल्हाधिकारी म्हणून आशिमा मित्तल यांनी 'घरपोच शासकीय सेवा' हा उपक्रम राबवून नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि परिणामकारक सेवा मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार जाण्याची गरज कमी झाली असून, सेवा वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. राज्यभरातील इतर जिल्ह्यांसाठी हा उपक्रम आदर्श ठरणारा असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## पाली, बोरखेड, नाळवंडीत मतदानाचा उत्साह

# गुलाल कुणाचा आज फैसला!

**बीड । प्रतिनिधी**

**राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशानुसार बीड तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम प्रशासनाकडून अत्यंत चोखपणे राबवण्यात आला . या प्रक्रियेत सहा ग्रामपंचायतींमध्ये केवळ एकच अर्ज प्राप्त झाल्याने तेथे मतदानाची गरज भासली नाही , तर उर्वरित तीन ग्रामपंचायतींसाठी २८ एप्रिल रोजी नऊ मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडली . यामध्ये पाली ६७, बोरखेड ६३ तर नाळवंडी ६५ टक्के मतदान झाल. सहा ठिकाणी मतदानाची गरज उरली नाही.**

निवडणूक जाहीर झालेल्या नऊ ग्रामपंचायतींपैकी साखरे बोरगाव , वांगी , पिंपळनेर , तांदळवाडी भिल्ल आणि सावरगाव घाट या पाच ठिकाणी सदस्य पदासाठी प्रत्येकी केवळ एकच नामनिर्देशन पत्र दाखल झाले . तसेच घोसापुरी येथे सरपंच पदासाठी देखील एकच वैध नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने , या ठिकाणी निवडणूक घेण्याची आवश्यकता भासली नाही. दुसरीकडे, साखरे बोरगाव येथील सरपंच पदासाठी वैध अर्ज असणाऱ्या उमेदवाराचे दुर्दैवी निधन झाल्याने जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशानुसार येथील निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे . पाली, बोरखेड आणि नाळवंडीत शांततेत मतदान : पाली, बोरखेड आणि नाळवंडी या तीन ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात आज मतदारांनी आपला हक्क बजावला . या प्रक्रियेसाठी २३ एप्रिल रोजीच मतपेट्यांचे सीलिंग करण्यात आले होते . मंगळवारी सकाळी ७:३० ते सायंकाळी ६:३० या वेळेत मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पडली . या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अरुण मोरे (पाली) , कल्याण शेळके (बोरखेड ) आणि विनायक येळंबकर (नाळवंडी) यांनी जबाबदारी सांभाळली. तहसीलदार व नायब तहसीलदारांचे सूक्ष्म नियोजन : ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी करण्यामागे प्रशासकीय यंत्रणेचे विशेष नियोजन आहे . चंद्रकांत शेळके ( तहसीलदार बीड )तथा निवडणूक निर्णय प्राधिकृत अधिकारी म्हणून त्यांनी सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींचे नेतृत्व केले . त्यांच्या अचूक नियोजनामुळे संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पडली. सुहास हजारे , निवासी नायब तहसीलदार यांनी निवडणूक समन्वय अधिकारी म्हणून त्यांनी मतदान केंद्रांवरील व्यवस्था , कर्मचाऱ्यांचे नियंत्रण आणि तांत्रिक बाबींचे यशस्वी संचलन केले. प्रशासकीय सहकार्य आणि निकालाची उत्सुकता :- या महत्त्वपूर्ण कामकाजात महादेव चौरे , संतोष मुळीक , तुकाराम जाधव आणि विवेक कोळपकर यांनी सक्रिय सहभाग नोंदवत निवडणूक यंत्रणेला मोलाचे सहकार्य केले . आज मतदान झालेल्या तीनही ग्रामपंचायतींची मतमोजणी दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी तहसील कार्यालय बीड येथे पार पडणार आहे . आता कोणाच्या गळ्यात विजयाची माळ पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पोलीस कस्टडीतील मृत्यू की खून?

## केज पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी तीव्र

**बीड । प्रतिनिधी**

**केज पोलीस स्टेशन आधीच राज्यभर चर्चेत असताना आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. केज तालुक्यातील तरुण आशिष धिवार यांचा पोलीस कस्टडीमध्ये झालेल्या कथित मारहाणीमुळे बीड जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, हा मृत्यू नसून थेट खून असल्याचा आरोप होत आहे.**



रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम वीर यांनी कठोर भूमिका घेत, ''केज पोलिसांवर तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करावा,'' अशी जोरदार मागणी केली आहे. ''हा साधा मृत्यू नाही, तर पोलीस अत्याचाराचा परिणाम आहे. दोषींना वाचवण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल,'' असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, मयत आशिष धिवार यांच्या कुटुंबीयांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असून, न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ''आधी गुन्हा दाखल करा, मगच अंत्यसंस्कार,'' अशी त्यांची ठाम भूमिका आहे. याशिवाय, कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची मागणी पोस्टमार्टम इन-कॅमेरा पद्धतीने, बाहेरील जिल्ह्यातील डॉक्टरांकडून करण्याची मागणी हीही पुढे करण्यात आली आहे. या घटनेची दखल घेत, रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर लवकरच केज येथे भेट देणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे केज पोलिसांविरोधात प्रचंड रोष निर्माण झाला असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. आता प्रशासन या गंभीर आरोपांवर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्वतंत्र बियाणे कायद्याचा केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणार-दत्तात्रय भरणे

**मुंबई । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावेत, त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे तसेच बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तत्काळ मिळावी, यासाठी राज्याचा सर्व शिफारशींसह स्वतंत्र बियाणे कायदा करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याचे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२५ दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन क्र. ६७६ नुसार बियाणे कायदा १९६६ मधील प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने कायद्यात सकारात्मक निर्णय घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल उपस्थित होते. तसेच आमदार सईताई डहाके, राजेश बकाने, हेमंत ओगले, रणधीर सावरकर, कृषी आयुक्त सुरज मांढरे आणि कृषी संचालक सुनिल बोरकर उपस्थित होते. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्यासाठी स्वतंत्र बियाणे कायदा करताना प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तातडीने मिळावी यासाठी ठोस तरतुदी कराव्यात. दर्जेदार बियाण्यांची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर निश्चित करणे, महाबीज कंपनीची



कार्यक्षमता वाढविणे, तसेच नियमभंग करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. याशिवाय जिल्हास्तरावर बियाणे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याची तरतूद करावी. 'साथी' पोर्टलवर ट्रुथफुल बियाण्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू करणे, तसेच विद्यापीठांमार्फत होणाऱ्या संशोधन प्रक्रियेबाबत कायद्यात स्पष्ट तरतुदी करण्याचाही प्रस्तावात समावेश करण्याचे निर्देश दिले. पुढे बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, नव्या कायद्यात बियाणे उत्पादक, प्रक्रिया केंद्र, वितरक, विक्रेते आणि रोपवाटिका यांची नोंदणी सक्तीची करण्याचा विचार आहे. शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाणघेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण देण्याची तरतूद करण्यात येणार आहे. रोपवाटिकांची नोंदणी अनिवार्य करून त्यांना रोपांच्या उगमाचा नोंदवही ठेवणे बंधनकारक केले जाईल. तसेच बियाण्यांच्या पिशवीवर क्यूआर कोड देणे आणि 'सेंट्रलाइज्ड सीड ट्रेसिबिलिटी पोर्टल'द्वारे बियाण्यांचा मागोवा घेणे अनिवार्य करणे, बियाण्यांमधील विषाणू, बॅक्टेरिया आणि बुरशी यांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी 'सीड हेल्थ स्टँडर्ड्स' लागू करण्याची तरतूदही करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

## पान १ वरून...

### सरकारला अजून

धोरणांमुळे स्थानिक शेतकरी अडचणीत सापडतो. नुकसानभरपाई जाहीर केली जात असली, तरी प्रत्यक्षात अल्प रक्कम खात्यात जमा होते. अनेकांना तीही मिळत नाही. या विसंगतीमुळे शेतकरी आत्महत्यांचा आकडा वाढत असल्याचे वास्तव आहे. शेतकरी आपल्या पिकाला लेकरासारखे जपत असतो. मात्र, अवकाळी पावसाने पिके नष्ट झाल्यावर त्याच्यासमोर आर्थिक आणि मानसिक संकट उभे राहते. वर्षभराचे कष्ट वाया गेल्याने आणि कर्जफेडीचा ताण अस झाल्याने तो आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतो.

------------

### खा.सोनवणेंच्या गाडीला

यांच्या कारचे नुकसान झाले. त्यांच्या कारच्या काचा फुटल्या. तर दुचाकीस्वार किरकोळ जखमी झाला आहे. खासदार बजरंग सोनवणे हे बीडहून केजकडे जाताना त्यांचा ताफा मस्साजोगच्या बस स्थानकावर थांबला होता. त्यावेळी ही अपघाताची घटना घडली. अपघातानंतर रस्त्यावर जमाव जमला होता. जखमीला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

----------

### १३० व्या घटना दुरुस्ती विधेयकाबाबत संयुक्त

संसदेच्या संयुक्त संसदीय समितीने संविधान (१३० वी दुरुस्ती) विधेयक २०२५, जम्मू-काश्मीर पुनर्गठन (दुरुस्ती) विधेयक २०२५ आणि केंद्रशासित प्रदेश शासन (दुरुस्ती) विधेयक २०२५ या महत्त्वपूर्ण विधेयकांवर सखोल चर्चा आणि व्यापक सल्लामसलत सुरू केल्याची माहिती समितीच्या अध्यक्षा अपराजिता सारंगी यांनी हॉटेल ताज येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. अपराजिता सारंगी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, ही तीनही विधेयके केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २० ऑगस्ट २०२५ रोजी लोकसभेत मांडली होती. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी ती तपासणी व अहवालासाठी संयुक्त संसदीय समितीकडे वर्ग करण्यात आली. या समितीत लोकसभेतील २१ आणि राज्यसभेतील १० अशा एकूण ३१ संसद सदस्यांचा समावेश आहे. समितीने आतापर्यंत ९ बैठकांचे आयोजन करून गृह मंत्रालय, विधि व न्याय मंत्रालय, कायदा आयोग, विविध राष्ट्रीय कायदा विद्यापीठे, कायदा संशोधन संस्था तसेच राजस्थान, हरियाणा, मध्य प्रदेश आदी राज्य सरकारांचे प्रतिनिधी आणि इतर संस्थांचे म्हणणे ऐकले आहे. संविधानिक नैतिकता जपणे आणि राजकारणाचे अपगुन्हेगारीकरण साध्य करण्याच्या दृष्टीने समितीने दिल्लीबाहेरही बैठक घेण्याचा निर्णय घेतला असून, त्या अनुषंगाने समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गृह आणि विधि व न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी, न्यायिक संस्था व विधिज्ञ संघटनांचे मत प्रत्यक्ष ऐकण्यासाठी बैठक घेतली. २९ एप्रिल २०२६ रोजी भुवनेश्वर येथे जाऊन ओडिशा सरकार आणि तेथील संस्थांकडूनही समिती मते जाणून घेणार असल्याचे सारंगी यांनी सांगितले. संविधान (१३०वी दुरुस्ती) विधेयक २०२५ द्वारे भारतीय संविधानातील कलम ७५, १६४ आणि २३९(अअ) मध्ये सुधारणा सुचवण्यात आली असून, गंभीर गुन्ह्यांच्या आरोपांखाली सलग ३० दिवस कोठडीत असणाऱ्या उच्च घटनात्मक पदांवरील व्यक्तींना त्या काळात कार्यकारी अधिकारांचा वापर करता येऊ नये, असा मुख्य हेतू असल्याचे सारंगी यांनी सांगितले.

----------

### विधानपरिषदेसाठी भाजपाकडून

जिल्हाध्यक्ष राहिले आहेत. तसेच, प्रमोद जठार यांनाही भाजपने संधी दिली असून जठार हे कोकणातील भाजपचे महत्त्वाचे नेते आहेत. कोकणावर अन्याय होत असल्याची भावना भरुन काढण्याचा प्रयत्न भाजपकडून या उमेदवारीच्या माध्यमातून करण्यात आला आहे. विवेक कोल्हे यांनी काल रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. वाढदिवसानिमित्ताने ही भेट घेतली असल्याची सूत्रांची माहिती होती. कोल्हे परिवाराचे नगर जिल्ह्यात वर्चस्व मानले जाते. विवेक कोल्हे हे ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांचे नातू तर माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव आहेत. अहिल्यानगरमधील कोपरगावात काळे-कोल्हे असा जुना संघर्ष आहे. विधानसभा निवडणुकीवेळी आशुतोष काळे यांना राष्ट्रवादी कांग्रेसनं कोपरगावमधून संधी दिल्यानंतर भाजपकडून कोल्हे यांना महायुतीचा धर्म पाळण्याचे आदेश दिले होते.

**पोटनिवडणुकीसाठी प्रज्ञा सातव यांना उमेदवारी**

काँग्रेसच्या विधानपरिषदेच्या आमदारकीचा राजीनामा देत प्रज्ञा सातव भाजपमध्ये दाखल झाल्या होत्या. त्यांच्या रिक्त जागेवर भाजपनं त्यांना उमेदवारी दिली आहे.

---------------

### कर्मचाऱ्यांच्या पगारापेक्षा

खर्च केले आहे. यासाठी क्लाउडी कोड सारख्या कोडिंग टूल्सचा अतिवापर कारणीभूत ठरला. अमोस बार-जोसेफ यांनी सांगितले की, त्यांच्या केवळ ४ लोकांच्या टीमसाठी एआयचे एका महिन्याचे बिल १,१३ हजार डॉलर्स (सुमारे १.०६ कोटी रुपये) इतके आले आहे. एनव्हिडियाचे व्हीपी ब्रायन कॅटानझारो यांच्या मते, त्यांच्या टीमसाठी कॉम्प्युटिंगचा खर्च आता कर्मचाऱ्यांच्या पगारापेक्षा जास्त झाला आहे. एआयच्या वाढत्या खर्चाचा फटका आता सर्वसामान्यांनाही बसत आहे. अँथ्रोपिकच्या युजर्सनी तक्रार केली आहे की, त्यांच्या टोकन मर्यादा लवकर संपत आहेत, ज्यामुळे त्यांना पूर्ण फायदा घेता येत नाही. एक नवीन एआय क्लास तयार होत आहे, जिथे श्रीमंत युजर्स क्लाऊडी सारखी प्रगत टूल्स वापरत आहेत, तर कमी उत्पन्न गट मेटा एआय सारख्या मोफत आणि बेसिक टूल्सवर अवलंबून आहेत. खर्च कमी करण्यासाठी टेक दिग्गज कंपन्या प्रयत्नशील आहेत. गुगलने नवीन टेन्सर प्रोसेसिंग यूनिट(टीपीयू) लाँच केले आहेत, जे कमी वीज वापरून जास्त कार्यक्षमता देतात. तर ओपनएआयने आपले नवीन मॉडेल जीपीटी-५.५ लाँच केले असून, ते कमी टोकन्समध्ये अधिक काम करते, ज्यामुळे भविष्यात खर्च कमी होण्याची शक्यता आहे.

------------

### १ मे पासून मराठी सक्तीची

सर्व संघटनांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. ओला, उबेर चालकांना देखील मराठी भाषा अनिवार्य आहे. संघटनांनी मुदतवाढीची मागणी केली होती. त्यानुसार १०० दिवसांची मुद्दतवाढ देण्यात आली आहे. मात्र, १ मे ते १५ ऑगस्ट पर्यंत मराठी भाषा सक्तीची मोहिम सुरू राहील. राज्यातील सर्व ५९ आरटीओला तसे निर्देश देण्यात आले आहेत. मराठी भाषेसाठी आम्ही आता कारवाई करणार नाही. पण मराठी त्यांना बोलावी लागेल,'' असे सरनाईक म्हणाले. ज्या संघटनांनी मागणी केली आहे की, आम्ही मराठी भाषा शिकायला तयार आहोत त्यांच्यासाठी आरटीओ कार्यालयात जागा उपलब्ध करणार आहोत. त्यामुळे मराठी भाषा येत नसेल तर लायसन्स १५ ऑगस्टपर्यंत रद्द होणार नाही. चालकांनी मराठी शिकावी यासाठी परिवहन विभाग शंभर दिवस मोहीम राबवणार असून त्यांच्यासाठी बुधवारी कॅबिनेट बैठकीत पुस्तक प्रकाशन करणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

---------

### डिजिटल अरेस्ट: ९,४००

सुर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने या प्रकरणाची स्वत:हून दखल घेतली. डिजिटल अरेस्ट प्रकरणांमधील पीडितांना नुकसान भरपाई देण्यासाठी आरबीआय, दूरसंचार विभाग आणि इतर एजन्सींना संयुक्तपणे एक आराखडा तयार करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.आय ४ सी, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (मैट) आणि दूरसंचार विभाग (डीओटी) यांनी व्यक्त केलेल्या चिंतेनंतर व्हॉट्सअॅपने जानेवारी २०२६ मध्ये एक विशेष तपास मोहीम सुरू केली, असे अॅटर्नी जनरल आर. व्यंकटरमणी यांच्यामार्फत दाखल केलेल्या अहवालात म्हटले आहे. या मोहिमेदरम्यान व्हॉट्सअॅपने १२ आठवड्यांत डिजिटल अरेस्टशी संबंधित ९४०० खात्यांवर बंदी घातली आहे.

----------

# भौतिक प्रगती बरोबर संतांच्या विचाराच्या स्वागताची समाजाला गरज- महादेव महाराज चाकरवाडीकर

**बीड । प्रतिनिधी**

**भौतिक प्रगती बरोबर संतांच्या विचाराच्या स्वागताची समाजाला गरज आहे.संत विचारा शिवाय झालेली भौतिक प्रगती व्यसनाधीनकडे घेऊन जाते. वैश्विक अनहित टाळण्यासाठी साधू जीवन डोळासमोर ठेवा. संतांचे विचार कृतीत आणले पाहिजेत. असे प्रतिपादन श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते यावेळी उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प विष्णुपंत महाराज लोंढे गुरुजी, श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, ह भ प नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प श्रीकृष्ण महाराज यादव, अच्युत महाराज घोडके, मारुती महाराज चोरमले,अर्जुन महाराज शिंदे, जनार्दन महाराज बांगर,प्रशनांत महाराज क्षीरसागर,आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे डॉ राजेंद्र वीर यांच्या सह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.**

बीडच्या नेकनुर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या भव्य दिव्य पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत निळोबा महाराजांच्या. काय त्यांचा महिमा वाणूं वारंवार । हरिभक्त थोर भूमंडळीं ।।१।। ज्याचिये भेटीचें आर्त ब्रम्हांदिकां । पूज्य सकळ लोकां विश्वा झालें ।।२।। यमधर्म वास पाहे नित्य



काळ । म्हणे धन्य वेळ भेटती ते ।।३।। निळा म्हणे सर्व भाग्यें चोजविती । रिध्दिसिध्दि येती वोळंगणे ।।४।। या अभंगावर सुंदर चिंतन मांडले. जगानेभारतीय संतांचा गौरव केला आहे.संतांचा महिमा वर्णन करता येत नाही. संतांच्या संगतीत आले तर पशु पक्षी यांचा उद्धार होतो.मानवी जीवाला जो पर्यंत सत्संग होत नाही उद्धार होत नाही. बीड जिल्हा ही संतांची पवित्र भूमी आहे. संत बंकट स्वामींनी वारकरी परंपरेच्या माध्यमातून या परिसराला नवे मराठवाड्या नव्हे महाराष्ट्राला भक्तीच्या परंपरेमध्ये आणण्याचे महत्त्वाचे काम केले. स्वामींच्या परंपरेचे व्यापक कार्य पुढे घेऊन जाण्याचे काम महंत लक्ष्मण महाराज मेंगडे करत आहेत. स्वामींचा महाराजांच्या सत्संगाचा कृपा आशीर्वाद मिळालेला आहे. नीती सदाचार ही देणगी संताच्या सहवासात मिळते. प्रेम म्हटले की सर्व भाव गळून पडतात.संत बंकटस्वामी महाराज यांचे समाधीस्थळ आशीर्वाद घेण्याचे ठिकाण आहे. सेवा करण्याची संधी मिळणे हे परम भाग्याचे लक्षण आहे. जगाच्या पाठीवर हरिभक्त हे थोर आहेत देव आणि देवाच्या अंगी असलेले गुण सर्व संताकडे आहेत. त्यामुळे देव आणि संत हे वेगळे नाही तर त्यांच्या प्रतिमा वेगळ्या आहेत. देवाच्या अंगी असलेले गुण हे संताच्या अंगी पाहायला मिळतात. त्यांचा महिमा वर्णन करता येत नाही. शब्दाच्या पलीकडे त्यांचा महिमा आहे, असं महाराजांनी वेगवेगळ्या अभंगातील प्रमाणांनी दृष्टांत आणि सुभाषितांनी पटवून दिले. किर्तन ऐकताना मंडपातील हजारो भावी भक्त मंत्रमुग्ध झाले होते. या कीर्तनात सात संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक बिबीशन महाराज कोकाटे, हरिभाऊ महाराज काळे, मृदंग वादक प्रवीण महाराज यादव, अभय महाराज कोकाट यांच्यासह बंकट स्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी गायक वादक मंडळी यांची उपस्थिती होती.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि.२९ एप्रिल २०२६
३

## थोडक्यात

### ५० अनुकंपाधारकांना न्याय मिळाला जिल्हा परिषदेत ‘परिचर’पदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या अनुकंपा तत्त्वावरील ५० पाल्यांना जिल्हा परिषदेने परिचर पदावर नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहे. जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याचे आकस्मिक, अपघाती अथवा दुर्धर आजाराने निधन झालेल्या कर्मचाऱ्याच्या पाल्याची अनुकंपाधारकाची सेवा जेष्ठता सूची करण्यात आली होती. सदर भरती करण्यात यावी यासाठी अनुकंपाधारकांनीही पाठपुरावा केला होता. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) प्रदीप काकडे, सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी सुनील नवले, संतोष गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. अनुकंपाधारकांना परिचरपदी नियुक्ती मिळाल्यामुळे आनंद व्यक्त करण्यात आला आहे.

### सोमवारी लोकशाही दिन

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ४ मे २०२६ रोजी सकाळी १०-०० वाजता या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे, आपले सरकार व पी.जी.पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीच्या अंतिम अहवालासह वेळेवर उपस्थित राहावे.

### एनएमएमएस परीक्षेत जि.प. माध्यमिक शाळा चौसाळा शाळेचे उत्तुंग यश

चौसाळा । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या मार्फत २८ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती एनएमएमएस परीक्षेत एकूण २८ विद्यार्थी पास झाले असून त्यापैकी चार विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत त्यामध्ये



कु.तनुजा बप्पासाहेब खाकरे, आदिती अतुल शिंदे, ज्ञानेश्वरी अमोल जगताप, आदिती नितीन पवार या चार विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीमध्ये समावेश झाला असून त्यांना दरवर्षी १२ हजार रुपये याप्रमाणे पुढील चार वर्षात ४८ हजार रुपये प्रति विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळणार आहे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक वृंद शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे ज्येष्ठ शिक्षक श्री सुभाष काकड,सांस्कृतिक विभाग प्रमुख लक्ष्मण राऊत, तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शाळेतील शिक्षक वृंद यामध्ये उद्धव घोडके, संतोष परतापुरे,वैभव शिंदे, ज्ञानेश्वर मस्के, योगानंद गांधले दिलीप बोराडे श्रीमती शालिनी काकडे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांचे व विद्यार्थ्यांचे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रणिता गंगाखेडकर मॅडम केंद्रप्रमुख तुकाराम सपाटे शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे, उपाध्यक्ष श्रीमती जोगदंड सर्व सदस्य व पालकांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरुन...

### शिरूर तालुक्यातील पर्यवेक्षक

नियुक्ती आहे. याशिवाय २३ प्रगणक व ४ पर्यवेक्षक हे राखीव आहेत.

शहरी भागासाठी गणेश दहिफळे मुख्याधिकारी नगरपंचायत हे चार्ज अधिकारी असून १७ घरयादी गटासाठी प्रगणक व ३ पर्यवेक्षक नियुक्त आहेत. दोन प्रगणक व एक पर्यवेक्षक राखीव आहेत.

त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रा. सुधीर येवले, प्रा.व्ही एस जाधव, प्रा. पी एस मुळे, प्रा. ए के लाहोटी या चार फिल्ड ट्रेनर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जनगणना कक्षामध्ये अशोक जाधव, शिवाजी जाधव, मंडळ अधिकारी निळकंठ सानप, ग्राम महसूल अधिकारी कृष्णा रत्नपारखे, राहुल गोरडे हे काम पाहत आहेत. याशिवाय प्रशिक्षण व्यवस्थेसाठी मंडळ अधिकारी शहादेव सानप, ग्राम महसूल अधिकारी बाळासाहेब बांगर, महसूल सेवक बळीराम काकडे, अविनाश काकडे, भरत सातपुते, दशरथ ढवळे, अभिषेक डोंगरे हे योगदान देत आहेत.

जनगणना २०२७ ही १८७२ पासून ची सोळावी जनगणना आणि स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना आहे. ही जनगणना दोन टप्प्यात केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात घरयादी गट तयार करणे व घर गणना करणे हे काम मे व जून २०२७ महिन्यात केले जाणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष लोकसंख्येची गणना फेब्रुवारी २०२७ मध्ये केली जाणार आहे. यावेळी २०२७- हा मोबाईल ॲप वापरून डिजिटल पद्धतीने जनगणनेची आकडेवारी संकलित केली जाणार आहे. या जनगणनेत प्रगनक स्वतःच्या मोबाईल फोनचा वापर करून घरांची माहिती डिजिटल पद्धतीने संकलित करतील. याशिवाय कुटुंबांना ://... या निर्दिष्ट वेब पोर्टल द्वारे स्वगणनेचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या जनगणनेच्या माध्यमातून घरांची स्थिती, मूलभूत सुविधा व मालमत्ता, लोकसंख्या, धर्म, जात, जमात, भाषा, साक्षरता, शिक्षण, आर्थिक व्यवसाय यासारख्या घटकावरील सूक्ष्म माहिती उपलब्ध होणार आहे.

या माहितीचा शासनाची ध्येयधोरणे व विकासात्मक योजना तयार करण्यासाठी होणार आहे.

तरी सर्व नागरिक बंधू भगिनींना आवाहन करण्यात येते की, आपण आपल्या कुटुंबात भेट देणाऱ्या प्रगनक यांना सकारात्मक व अचूक माहिती देऊन या कार्यात सहभागी व्हावे.

सुरेश घोळवे,तहसीलदार शिरूर कासार

## तारकेश्वर गडाच्या विकासासाठी कटिबद्ध -आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र तारकेश्वर गड (महिंदा, ता. आष्टी) येथे श्री संत गुरुवर्य नारायण बाबा महाराज यांच्या १५ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित सप्ताह सांगता कार्यक्रमात आ.सुरेश धस यांनी उपस्थित राहून भाविकांशी संवाद साधला.

ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या धार्मिक सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती लाभली.

यावेळी आमदार धस यांनी श्री तारकेश्वराचे दर्शन घेत गुरुवर्य नारायण बाबा महाराज यांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले. गुरुवर्य बाबांच्या आशीर्वादामुळेच मला जनसेवेची संधी मिळाली, अशी कृतज्ञ भावना व्यक्त



केली. तारकेश्वर गडावर प्रत्येक वेळी येताना त्या आशीर्वादांची जाणीव नव्याने होत,असल्याचेही यावेळी आ.धस यांनी यावेळी सांगितले.

तारकेश्वर गड हा आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या सीमेवर असून अत्यंत महत्त्वाचा आणि भक्तांचे श्रद्धास्थान असून पाथर्डी,शेवगाव, शिरूर कासार आणि आष्टी परिसरातील हजारो भाविक येथे नियमित दर्शनासाठी याठिकाणी येतात.या पवित्र स्थळी जाण्यासाठी रस्त्याची अडचण आहे हे मी मान्य करत असल्याचे सांगत भाविकांच्या या अडचणीची गंभीर दखल घेत आमदार धस यांनी राज्य शासनाच्या हॅम योजनेअंतर्गत महिंदा ते खडकत या रस्त्याच्या सिमेंट काँक्रेटीकरणाच्या कामास मंजुरी मिळाल्याची माहिती दिली. तसेच येत्या वर्षभरात या कामास प्रत्यक्ष सुरुवात होईल, असा ठाम विश्वास त्यांनी नागरिकांना दिला. या निर्णयामुळे तारकेश्वर गडाकडे जाणाऱ्या मार्गाचा कायापालट होणार असून भाविकांची सोय मोठ्या प्रमाणात होणार असल्याचे सांगितले. तसेच गडाच्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमी कटिबद्ध असल्याचेही आ.धस यांनी सांगितले. या प्रसंगी ह.भ.प. तुकाराम महाराज मुंढे, ह.भ.प. रोहिदास महाराज गर्जे, ह.भ.प. अनिल देवळकर महाराज यांच्यासह राहुल राजळे, विक्रम राजे भोसले, गणेश आव्हाड, अंकुश चितळे, अनिल मोहिते, दिनकर तांदळे, आजिनाथ सानप, सरपंच दहिफळे, माणिक दहिफळे, विठ्ठल गर्जे, शंकर मिसाळ, विष्णु दहिफळे, वसंत मिसाळ तसेच पंचक्रोशीतील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महासांगवीच्या महेश गर्जेचे यश कौतुकास्पद; तरुण पिढीने त्यांचा आदर्श घ्यावा - सरपंच नामदेव सानप

पाटोदा । प्रतिनिधी

जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील तरुणही यशाची उत्तुंग शिखरे सर करू शकतात, याचे उत्तम उदाहरण महासांगवीच्या महेश गर्जे यांनी घालून दिले आहे. महेश विष्णू गर्जे यांची नुकतीच ’एलबीओ स्किल १’ (डइज ड्ड्ढळश्रश्र १) या पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला. महेशने मिळवलेले यश हे केवळ त्याचे वैयक्तिक यश नसून संपूर्ण गावाचा अभिमान आहे. पुढील पिढीने त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रगती करावी, असे आवाहन महासांगवीचे लोकनियुक्त सरपंच नामदेव सानप यांनी यावेळी केले.



विष्णू सर्जेराव गर्जे व शांतीलाल गर्जे यांचे पुतणे असलेल्या महेश गर्जे यांच्या निवडीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. गेल्या तीन वर्षांपासून महासांगवी गावचे सरपंच नामदेव सानप व चैत्रालीताई सानप यांनी गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहित करण्याची नवी परंपरा सुरू केली आहे. याच परंपरेतून समाजापुढे एक आदर्श ठेवून तरुण पिढीची जिद्द वाढवण्याचे काम सानप दांपत्य करत आहे.


या सत्कार समारंभाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ह.भ.प. राधाताई आईसाहेब महाराज उपस्थित होत्या. त्यांनी संत भगवान बाबांच्या एकवेळ उपाशी राहा, पण मुलांना शिकवा या मूलमंत्राची आठवण करून दिली. महासांगवी हे एक प्रगतशील गाव असून, शिक्षणाबाबतची ही सकारात्मक परंपरा कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी महेंद्र गर्जे साहेब यांनीही उपस्थित तरुणांना मार्गदर्शन करत यशाचा मार्ग खडतर असला तरी सातत्य ठेवल्यास यश नक्की मिळते, असा संदेश दिला. या कार्यक्रमाला मधुकर गर्जे (अण्णा), डायरेक्टर हरिदास गर्जे, लक्ष्मण मिसाळ, रामदास गर्जे, दीपक गर्जे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महेश गर्जे यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत आदित्य फिजिओथेरपी कॉलेजचा डंका; तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के

बीड । प्रतिनिधी



भगत माधवी प्रतीक्षा गवई सुरवसे माधुरी मोमीन रक्षंदा कसबे प्रतीक्षा कोळी प्रियांका सरवदे प्रीती समृद्धी शिर्के विशाल पवार

शहरातील आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या (चणक्ड) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणीत यश मिळवत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

यामध्ये माधुरी बाळासाहेब सुरवसे हिने प्रथम क्रमांक पटकावला. माधवी सुधाकर भगत हिने द्वितीय, तर प्रतीक्षा अशोक गवई हिने तृतीय क्रमांक मिळवला. द्वितीय वर्षात प्रियांका विजयराव कोळी हिने प्रथम, प्रतीक्षा राजेंद्र कसबे हिने द्वितीय आणि रक्षंदा मोमीन हिने तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम वर्षात प्रीती शिवाजी सरोदे हिने प्रथम, विशाल मारुती पवार याने द्वितीय आणि समृद्धी शिर्के हिने तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले.

या विद्यार्थ्यांचे अभिनंदन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले. द्वितीय वर्षात प्रथम क्रमांक मिळवणारी प्रियांका कोळी म्हणाली की, महाविद्यालयात अभ्यासासाठी समृद्ध ग्रंथालय आणि वाचनालयाची उत्तम सोय आहे. शांत वातावरण आणि उपलब्ध संदर्भग्रंथांमुळे आम्हाला परीक्षेची तयारी करणे सोपे झाले. तर तृतीय वर्षात प्रथम क्रमांक मिळवणारी माधुरी सुरवसे म्हणाली की, अनुभवी शिक्षक आणि त्यांनी वेळोवेळी केलेले योग्य मार्गदर्शन यामुळेच आम्ही हे यश मिळवू शकलो. कठीण विषय सोपे करून शिकवल्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला.

केवळ अभ्यासच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना उत्तम आरोग्यदूत म्हणून घडवणे हेच आमचे ध्येय आहे.

-डॉ. आदिती सारडा,

ग्रामीण भागातील मुले आव्हानात्मक क्षेत्रात प्रगती करत आहेत

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बोलताना आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा म्हणाले की, गुणवंत विद्यार्थी, अनुभवी प्राध्यापक आणि अत्याधुनिक सुविधांचा संगम यामुळेच हे यश शक्य झाले आहे. ग्रामीण भागातील मुले फिजिओथेरपीसारख्या आव्हानात्मक क्षेत्रात प्रगती करत आहेत, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangigmail.com PHno02483-271787

जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी- १४६
दिनांक : २८ ०४/२०२६

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार जयश्री विठ्ठल मालघन रा. शिंदेवडगांव ता.घनसावंगी जि.जालना यांनी नामे सुभाष उत्तम साबळे रा. कोठाळा बु ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १२४५ दि. २०/०४/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. २३६ दिनांक:- २७/०४/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. सुभाष उत्तम साबळे रा. कोठाळा बु ता.घनसावंगी जि.जालना नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३७ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १७०५/३७ मधील क्षेत्र ८३.८७५ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिमेस :- प्लॉट नं. २६
दक्षिणेस :- प्लॉट नं. ३६
उत्तरेस :- प्लॉट नं. ३८

या वरील चतुः सिमा मधील क्षेत्र ८३.८७५ चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangigmail.com PHno02483-271787

जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी- १४८
दिनांक : २८ ०४/२०२६

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शरद सुधाकर मोरे रा. शिंदेवडगांव ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे शिवप्रसाद भगवानदास चांडक रा. कुंभार पिंपळगांव ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ११५६ दि. १३/०४/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. २३५ दिनांक:- २७/०४/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. शिवप्रसाद भगवानदास चांडक रा. कुंभार पिंपळगांव ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ४८ सि.स.नं. - ज्याचा मिळकत क्रं. १७०५/४८ मधील क्षेत्र ८८.४१५ चौ. मी नावे करणेस्तव ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- उमेश देशमुख यांची जमीन
पश्चिमेस :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिणेस : प्लॉट नं. ४९
उत्तरेस :- प्लॉट नं. ४७

या वरील चतुः सिमा मधील क्षेत्र ८८.४१५ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

पान ६ वरुन...

### मजीप्रा सेवानिवृत्तांची

ठाण मांडून आंदोलन करतील ही वेळ शासनाने येऊ देऊ नये असा इशारा बीड जिल्हा मजीप्रा सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे सल्लागार प्रभाकर शेटे यांनी दिला आहे.

मी जीवन प्राधिकरण मधून जलसेवक म्हणून सेवानिवृत्त झालो आहे.पेन्शन दर महिन्याला वेळेवर होणार म्हणून आम्ही डोळे लावून ०१ तारखेची वाट पाहत असतो,मार्च महिन्याची पेन्शन मिळाली नाही म्हणून माझ्या सारख्या कमी पेन्शनवाल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे हाल होत आहेत, आम्ही शिक्षणात अडाणी असल्याने पेन्शन न मिळण्यातील तांत्रिक अडचणी आम्हांला समजत नाहीत पण पेन्शन हा आमचा हक्क आहे आणि पेन्शन दर महिन्याला वेळेवर मिळावी एवढंच आम्हांला समजतं, हे शासनाला का समजत नाही एवढाच आमचा प्रश्न आहे.

-सर्जेराव पंढरपोटे,(सेवानिवृत्त जलसेवक )

### शिरूर (कासार) पोलिसांची

गुन्हा दाखल होताच स्थानिक गुन्हे शाखा (डउइ) बीड आणि शिरूर पोलीस ठाण्याच्या पथकांनी तात्काळ तपास सुरू केला. तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी खालील आरोपींना ताब्यात घेतले:

१) रुस्तुम गोवर्धन गवते (वय २३, रा. बेलोरा, जि. बीड)

२) सुरज मच्छिंद्र नागरगोजे (वय २०, रा. लिंबा, ता. शिरूर कासार) यांच्यासह इतर २ विधीसंघर्षग्रस्त बालकांना देखील ताब्यात घेण्यात आले आहे.

ही धडाकेबाज कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, शिरूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि प्रविण जाधव, पोउपनि खांडखुळे व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता. सध्या या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि प्रविण जाधव हे करत आहेत.

### माजलगावमध्ये शेतकऱ्यांचा

याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागण्या मान्य न झाल्यास दि. ४ मे २०२६ पासून गंगामसला शिवारातील गट क्रमांक २४ येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर जिल्हा चिटणीस ॲड. नारायण गोले पाटील, तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ उपचिटणीस राहुल सोळंके यांच्यासह सलीम खान, लक्ष्मण चव्हाण, अभिषेक सोळंके अशोक कुलकर्णी, सतीश शेजुळ, चांगदेव शेजुळ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### महाराष्ट्र फर्टीलायझर्स डीलर

करता साक्षीदार म्हणावे तपासणी अधिकाऱ्यांची संख्या वाढवणारी अधिसूचना रद्द करावी प्रमाणित बियाण्यांसाठी साठी पोर्टलचा वापर विक्रेत्यांवर सक्तीचा न करता कंपनीत मर्यादित ठेवावा रासायनिक खतांचा पुरवठा पद्धतीने व्हावा व विक्री मार्जिन वाढवावे गुणवत्ता तपासणीसाठी घेतलेल्या सॅम्पलची रक्कम शासनाने विक्रेत्यास द्यावी रक्कम खरीप हंगाम २०२६ मधील युरिया व डीएपी वितरणाबाबतच्या सूचनांचा फेरविचार व्हावा कंपन्यांनी विक्रेत्यांकडून मुदतबाह्य कीटकनाशके परत घ्यावीत दुय्यम दर्जाची अवैध कीटकनाशके तणनाशके व वायु पेस्टिसाइड विक्रीस प्रतिबंध करावा बियाणे कायदा २०२५ व कीटकनाशक कायदा २०२५ मधील विक्रेत्यांसाठीचे जाचक नियम शिथिल करावेत कोकण विभागातील आंबा काजू पिकाच्या नुकसानीसाठी विक्रेत्यांना जबाबदार धरू नये इत्यादी प्रमुख मागण्या मान्य होईपर्यंत कृषी सेवा केंद्र चालकांचे बेमुदत बंद आंदोलन सुरू राहणार असल्याचे महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टिसाइड सीड्स डीलर असोसिएशन यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### खत विक्रेत्यांच्या राज्यव्यापी

करण्यात यावी,विक्रेत्यांना आरोपी नव्हे तर साक्षीदार दर्जा देण्यात यावा,तपासणी अधिसूचना रद्द,साथी पोर्टल सक्ती रद्द, पद्धतीने पुरवठा व मार्जिन वाढ,सॅम्पल थकीत रक्कम शासनाकडून मिळावी,युरिया- वितरणाचा फेरविचार करावा,मुदतबाह्य औषधे कंपन्यांनी परत घ्यावीत अवैध उत्पादनांवर बंदी,नवीन बियाणे व कीटकनाशक कायद्यांतील जाचक अटी शिथिल करणे,हवामान नुकसानासाठी विक्रेते जबाबदार नाहीत, हा बंद शेतकरी हितासाठी आहे बाजारातील पारदर्शकता व न्याय्य व्यवस्था हवी, विक्रेते दोषी नसताना त्यांच्यावर अन्याय थांबवावा,शासनाला मागणी, तात्काळ चर्चेसाठी पुढाकार घ्यावा खरिप २०२६ पूर्वी निर्णय घ्यावेत मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र केले जाईल असा ईशारा संघटनेने दिला आहे. राज्यभर एकजुटीने बंद यशस्वी करण्याचा निर्धार,शेवटचा संदेश हा लढा केवळ विक्रेत्यांचा नाही, तर शेतकऱ्यांच्या हिताचा आहे.त्यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी या बंद मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा कृषी साहित्य विक्रेता संघटनेचे अध्यक्ष अंगद नवले आणि सचिव जयकिशोर बियाणी यांनी केले आहे.

# पोपटाने नुकसाल केलेल्या डाळिंब बागाची दहा वर्षानी मिळाणार नुकसान भरपाई

## हायकोर्टात खटला चालला, अखेर शेतकरी जिंकला
## फडणवीस सरकारला भरपाई देण्याचे आदेश





मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिलाय. एका शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्याचे आदेश खंडपीठाने फडणवीस सरकारला दिले आहेत. वर्धा जिल्ह्यातील शेतकरी महादेव डेकाटे यांच्या डाळिंबाच्या बागेचे पोपटांमुळे नुकसान झाले होते. या प्रकरणी शेतकऱ्याने तब्बल १० वर्षे कायदेशीर लढा दिला. अखेर, नागपूर खंडपीठाने याप्रकरणी ऐतिहासिक निकाल देत पोपटांनी केलेल्या डाळिंबाच्या बागेच्या नुकसानीची भरपाई देण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत.

वर्धा जिल्ह्यातील हिंगी गावचे ७० वर्षीय शेतकरी महादेव डेकाटे यांच्या डाळिंबाच्या बागेवर मे २०१६ मध्ये जवळच्या वन्यजीव अभयारण्यातून आलेल्या रानटी पोपटांनी हल्ला केला होता. या पोपटांनी बागेतील सुमारे २०० झाडांवरील डाळिंबांचा अक्षरशः फडशा पाडला होता. डेकाटे यांनी या नुकसानीबद्दल सरकारकडे भरपाई मागितली होती, परंतु सरकारने तांत्रिक कारणे देत ती नाकारली होती. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान राज्य सरकारने कोर्टात असा युक्तिवाद केला की, शासनाच्या नियमानुसार केवळ 'रानटी हत्ती' किंवा 'रानटी गवे' यांनी फळबागांचे नुकसान केल्यास भरपाई दिली जाते. पोपटांनी केलेल्या नुकसानीसाठी भरपाई देण्याची कोणतीही तरतूद शासन निर्णयात नाही, असा दावा सरकारने केला होता.

हायकोर्टाचा निकाल : न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने सरकारचा हा युक्तिवाद फेटाळून लावला. "वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार पोपट हा 'वन्यजीव' श्रेणीत येतो. जर संरक्षित प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना दिली नाही, तर शेतकरी वन्यजीवांना हानी पोहोचवणारे मार्ग अवलंबतील, ज्यामुळे कायद्याचा मूळ उद्देशच धोक्यात येईल," असे निरीक्षण कोर्टाने नोंदवले. राज्य सरकारला नुकसान भरपाईचे आदेश : या प्रकरणी उच्च न्यायालयाने सरकारला आदेश दिले आहेत की, महादेव डेकाटे यांच्या २०० झाडांच्या नुकसानीसाठी प्रत्येक झाडामागे २०० रुपये याप्रमाणे भरपाई देण्यात यावी. १० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर शेतकऱ्याचा हा विजय राज्यातील इतर शेतकऱ्यांसाठीही आशेचा किरण ठरला आहे.

## बहूपयोगी सेंद्रिय कीटकनाशक दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धती

सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून, हे शेतकर्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर :कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य :प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत :यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.दशपर्णी अर्काचा वापर :दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी. दशपर्णी अर्काचे फायदे :दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो.


## उन्हाळी हंगामात नागरमोथा, हाराळी आणि कुदा या तणांचे नियंत्रण

शेतीतील तण नियंत्रण, विशेषत: उन्हाळी हंगामात, एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. विविध प्रकारच्या तणांनी पिकांच्या वाढीला अडथळा आणला, उत्पादनावर परिणाम केला आणि शेतीच्या खर्चातही वाढ केली. यामध्ये नागरमोथा, हाराळी आणि कुदा यांचे नियंत्रण कसे करावे याची माहिती घेतल्यास अडचणी येत नाहीत.

उन्हाळी हंगामात तण नियंत्रणाची सुरवात कशी करावी?

उन्हाळ्याच्या हंगामात, अनेक शेतकऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारची तणे त्यांच्या शेतांमध्ये दिसतात. विशेषत: तणांची वाढ या हंगामात अधिक होऊ शकते कारण पाणी कमी असल्यामुळे जमीन हलकी होते आणि तण अधिक प्रमाणात उगवतात. अशा परिस्थितीत एक महत्वपूर्ण उपाय म्हणजे, शेतातील जमीन चांगली नागरून वखरून घेणे. वखरलेली आणि गाठलेली जमिन जाळा: शेतातील गाठी आणि काशा वेचून त्यांना जाळून टाकणे हे तणांच्या संख्येला कमी करण्याचा एक प्रभावी उपाय आहे. यामुळे तणाच्या मुळांवरही नियंत्रण मिळवता येते, तसेच त्यांच्या वाढीस अडथळा निर्माण होतो.

तणनाशकांचा वापर : नागरमोथा, हाराळी आणि कुदा या तणांचा प्रभावी नियंत्रणासाठी तणनाशकांचा वापर करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. त्यासाठी ग्लायफॉसेट हा तणनाशक खूप प्रभावी आहे. हे तणनाशक प्रामुख्याने कोवळ्या तणांवर प्रभावी असते, विशेषतः ते २ ते ४ पानांच्या अवस्थेत असताना.



ग्लायफॉसेट वापराची शिफारस : ग्लायफॉसेट तणनाशक हेक्टरी २. किलो प्रमाणात फवारावे. यासाठी बाजारात विविध ब्रॅण्ड्स उपलब्ध आहेत, जसे की ग्लायसेल, राऊंडअप, विडॉफ इत्यादी. फवारणीचे योग्य वेळापत्रक: तणनाशक फवारल्यानंतर, कमीत कमी दोन तास पाऊस पडणार नाही, याची काळजी घ्या. यामुळे तणनाशक पिकात चांगले शोषले जाते आणि अधिक प्रभावीपणे कार्य करते.

तणनाशक फवारणीनंतर काय काळजी घ्यावी : ग्लायफॉसेट फवारल्यानंतर, पुढील काही आठवडे शेतामध्ये कोणतीही मशागत करणे टाळा. यामुळे तणनाशकाचा प्रभाव टिकतो आणि तणाचे नियंत्रण अधिक प्रभावी होते. फवारणी केल्यावर ३ ते ४ आठवडे काहीही मशागत करणे टाळल्यास, तणांच्या मुळांची पूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता जास्त असते.

तणांचे नियंत्रण करण्यासाठी काही पर्यायी उपाय : जवळजवळ झाडींचे नियंत्रण: काही ठिकाणी झाडे आणि विविध वनस्पतींनी तणांचा वाढ थांबवता येतो. त्या व्यतिरिक्त, तणांचे नियंत्रण जैविक पद्धतीने देखील करू शकता. कंपोस्ट किंवा जैविक खतांचा वापर जास्त केल्यास तणांच्या वाढीस अडथळा आणू शकतो. पिकाच्या वाफ्यावर तणांची निवड: विविध पीकांच्या वाफ्यावर विविध तणांचा प्रकोप असतो. त्यामुळे त्या पिकानुसार तणांच्या नियंत्रण योजनेची तयारी करणे आवश्यक आहे.निष्कर्ष : तण नियंत्रणासाठी योग्य तंत्रांचा अवलंब करणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. खासकरून उन्हाळी हंगामात, योग्य वेळेत वखर करणे आणि तणनाशकांचा वापर हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. तसेच, फवारणी नंतर काही आठवडे मशागत टाळणे तणाच्या नियंत्रणामध्ये मदत करेल. शेतीत तणांचा योग्य नियंत्रण पद्धतीने करणे हे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३९ : मुघल सम्राट शाहजहान यांनी दिल्ली येथील लाल किल्ल्याचे निर्माण करण्यास पाया रचला.
१८१३ : अमेरिकन वैज्ञानिक जेएफ हम्मेल यांनी रबराचे नमुने सादर केले.
१९३० : ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया देशांतर्गत दूरध्वनी (टेलीफोन) सेवा सुरु करण्यात आली.
१९३३ : 'प्रभात'चा 'सिंहगड' हा चित्रपट प्रदर्शित झाला.
१९३९ : साली स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षामधून आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध इटलीतील जर्मन सैन्याने दोस्त राष्ट्रांपुढे बिनशर्त शरणागती पत्करली.
१९८६ : लॉस एंजेल्स सेंट्रल लायब्ररीतील आग लागल्यामुळे सुमारे ४,००,००० पुस्तक नष्ट झाले.
१९९१ : बांगलादेशच्या दक्षिण भागातील चितगाव जिल्ह्यात आलेल्या एका भीषण चक्रीवादळाने सुमारे १,३८,००० लोकांचा बळी घेतला तर सुमारे १ कोटि लोक बेघर झाले.
२००७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने श्रीलंकन क्रिकेट संघाचा पराभव करून तिसऱ्यांदा विश्वकप जिंकला.
२०११ : ब्रिटीश राजकुमार प्रिंस विलियम आणि केट मिडलटन यांचा विवाह पार पडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रताप यांचे मित्र, सहकारी आणि विश्वासपात्र सल्लागार भामाशाह यांचा जन्मदिन.
१७२७ : फ्रेंच नर्तक आणि बॅलेट चे निर्माते जीन-जॉर्जेस नोव्हर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑक्टोबर १८१०)
१८४८ : राजा रविवर्मा चित्रकार (मृत्यू: २ आक्टोबर १९०६)
१८६७ : डॉ. शंकर आबाजी भिसे भारताचे 'एडिसन' (मृत्यू: ७ एप्रिल १९३५)
१८९१ : भारतीय कवी आणि कार्यकर्ते भारतीदासन यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९६४)
१९०१ : मिचेनोमिया हिरोहितो दुसर्या महायुद्धाच्या आधी व नंतरच्या काळातील जपानी सम्राट (मृत्यू: ७ जानेवारी १९८९)
१९१९ : साली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात विशेष कौशल्य मिळविणारे प्रख्यात भारतीय तबला वादक अल्ला रखा उर्फ अल्लारख्खा कुरेशी यांचा जन्मदिन.
१९५८ : पद्मभूषण व साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ तसचं, द टेलीग्राफ, हिंदुस्तान टाईम्स आणि हिंदी दैनिक वृत्तपत्र अमर उजाला यांचे स्तंभलेखक रामचंद्र गुहा यांचा जन्मदिन.
१९३६ : झुबिन मेहता भारतीय संगीतकार
१९६६ : फिल टफनेल इंग्लिश फिरकी गोलंदाज
१९७० : आंद्रे आगासी अमेरिकन लॉनटेनिस खेळाडू
१९७९ : प्रसिद्ध भारतीय सेवानिवृत्त क्रिकेटपटू व जलदगती गोलंदाज आशिष नेहरा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे प्रभावी संस्थापक व दिल्लीच्या गादीवर राज्य करणारे पहिले मुस्लीम शासक शम्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१९४५ : हाइनरिक हिमलर जर्मन नाझी अधिकारी (जन्म: ७ आक्टोबर १९००)
१९५८ : भारताच्या उडीसा राज्यातील प्रख्यात स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक व गांधीवादी कार्यकर्ता गोपबंधू चौधरी यांचे निधन.
१९६० : पं. बाळकृष्ण शर्मा ऊर्फ 'नवीन' हिन्दी कवी. हिन्दीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. (जन्म: ८ डिसेंबर १८९७)
१९७९ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार, लेखक, क्रांतिकारक व समाजसुधारक राजा महेंद्र प्रताप यांचे निधन.
१९८० : श्रीकृष्ण के. क्षीरसागर लेखक, विचारवंत, समीक्षक (जन्म: ६ नोव्हेंबर १९०१)
१९८० : सर अल्फ्रेड हिचकॉक चित्रपट दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १८९९)
१९९७ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सतरावे गव्हर्नर व भारतीय प्रशासकीय सेवेचे सदस्य आर.एन.मल्होत्रा यांचे निधन.
१९९९ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, निर्माता, पटकथा लेखक आणि हिंदी चित्रपटांचे गीतकार केदार शर्मा यांचे निधन.
२००६ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (जन्म: १५ आक्टोबर १९०८)
२०१० : गायत्री मंडळाच्या संस्थापिका व सदस्या तसचं, समाजसेविका कमलादेवी शुक्ला यांचे निधन.

## बहूपयोगी सेंद्रिय कीटकनाशक दशपर्णी अर्क, तयार करण्याची पद्धती आणि वापर

खरीप पिकांची पेरणी/ लागवड केल्यानंतर सुरुवातीच्या काळात पिकांवर रसशोषक किडी आणि काही अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. यावेळी सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून या किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.

दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर : कडुनिंब पाला ५ किलो. एरंडपाला २ किलो. गुळवेलपाला २ किलो. घाणेरीपाला २ किलो. पपईचा पाला २ किलो. सिताफळाचा पाला २ किलो. रूईचा पाला २ किलो. पांढरा धोतरा २ किलो. करंजपाला २ किलो. लाल कन्हेरपाला २ किलो. झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य : प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत : यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.

दशपर्णी अर्काचा वापर : दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे : दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो.



राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत


# तलाठी,ग्रामसेवक,पोलीस पाटील यांच्या अहवालानंतर घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती मिळणार-तहसीलदार

अंबड। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ८ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार , अंबड तालुक्यातील घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी 'मोफत रेती' पुरविण्याची प्रक्रिया महसूल विभागामार्फत अत्यंत पारदर्शकपणे राबविण्यात येत आहे. सदर योजनाचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून तसेच, विभागीय आयुक्त श्री. जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, अप्पर, रमेश मिसाळ आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत भारती यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे. अंबड तालुक्यात तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मंडळ अधिकारी, तलाठी आणि ग्रामसेवक यांच्या साहाय्याने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

सद्यस्थिती आणि लाभार्थ्यांची निवड: शासनाच्या नियमानुसार, रेती घाटावरून वितरित होणाऱ्या एकूण रेतीपैकी १०% रेती ही घरकुल लाभार्थ्यांसाठी मोफत राखीव ठेवली जाते. सद्यस्थितीत तालुक्यात १०७५ ब्रास रेतीउपलब्ध झाली असून, त्याअनुषंगाने २१५ लाभार्थ्यांची (प्रत्येकी ५ ब्रास) नावे व माहिती प्रणालीवर अपलोड करण्यात आली आहे. जशी-जशी अतिरिक्त रेती उपलब्ध होईल, तशी उर्वरित पात्र लाभार्थ्यांची नावेही तात्काळ अपलोड केली जातील.

लाभार्थ्यांसाठी अर्ज करण्याची आणि रेती मिळवण्याची कार्यपद्धती: तहसील कार्यालयात थेट अर्ज नको:लाभार्थ्यांनी मोफत रेतीसाठी थेट तहसील कार्यालयात अर्ज करू नयेत. संबंधितांनी आपला अर्ज आपल्या गावचे ग्रामसेवक यांच्याकडे जमा करावा. संयुक्त तपासणी: ग्रामसेवक, तलाठी आणि पोलीस पाटील हे संबंधित लाभार्थ्याच्या बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करतील. घरकुलाचे बांधकाम चालू असल्याबाबतचे 'जीपीएस फोटो', ८-अ चा उतारा आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह संयुक्त अहवाल तहसील कार्यालयास सादर केला जाईल. ऑनलाईन नोंदणी व पडताळणी:अहवाल प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांची सर्व माहिती पोर्टलवर अपलोड केली जाईल. त्यानंतर लाभार्थ्याने स्वतःचे आधार कार्ड आणि आधार कार्डशी संलग्न असलेला (लिंक) मोबाईल क्रमांक



घेऊन तलाठ्याकडून त्याची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. रेती उचलणे तलाठ्याकडून पडताळणी पूर्ण झाल्यानंतर, लाभार्थ्याला अलर्ट करण्यात आलेल्या रेती घाटावर जावे लागेल. तेथे आपला आधार क्रमांक आणि ई-टीपी दाखवून झिरो रॉयल्टी पास' प्राप्त करावा व मंजूर असलेली ५ ब्रास मोफत रेती घेऊन जावी. अटी व शर्ती:वाहतुकीचा खर्च: शासनाकडून केवळ ५ ब्रास रेती मोफत दिली जाणार आहे. मात्र, सदर रेती वाहनात भरणे आणि ती घरकुलाच्या जागेपर्यंत वाहून नेणे (वाहतूक खर्च) हा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याला स्वतः करावा लागेल. पूर्ण झालेल्या घरकुलांना लाभ नाही: कोणत्याही परिस्थितीत ज्या लाभार्थ्यांचे घरकुल पूर्ण झालेले आहे, त्यांना या योजनेतून मोफत रेती दिली जाणार नाही. प्रशासनाकडून याची काटेकोरपणे दक्षता घेतली जात आहे. स्थानिक नद्यांमधील रेतीचा वापर: स्थानिक नद्यांमधील रेती ही स्थानिक वापरासाठी व मोफत घरकुल वापरासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. वरील प्रक्रियेनुसार ग्रामसेवक, तलाठी व पोलीस पाटील यांच्यामार्फत अहवाल आल्यास घरकुल लाभार्थ्यांना येथूनही मोफत रेती उपलब्ध करून दिली जाईल. तसेच, इतर स्थानिक नागरिकांना त्यांच्या वैयक्तिक वापरासाठी शासनाच्या निर्धारित दराप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर केल्यास रेती उपलब्ध करून दिली जाईल. अंबड तालुक्यातील जास्तीत जास्त पात्र घरकुल लाभार्थ्यांनी या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ घ्यावा आणि आपले घरकुलाचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे

## विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी; अकरा व्यक्तींच्या कर्तृत्वाचा सन्मान

सेलू। प्रतिनिधी

कै. अण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्थेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त सन्मान-कर्तृत्वाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ११ व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. मिनाताई रामप्रसाद बोर्डीकर यांचा मान्यवरांच्या हस्ते मातृगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

हा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी साई नाट्यगृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नामदेव महाराज ढवळे तर व्यासपीठावर राजयोगिनी ब्रह्मकुमारी करूणा दीदी, पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे, सभापती डॉ. संजय रोडगे, उद्योजक रामप्रसाद घोडके, संस्थेचे अध्यक्ष अशोक काकडे,



भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश काटकर आदींची उपस्थिती होती. पालकमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, आम्हा पाचही बहिणींना आमचे आईबाबा मिनाताई व रामप्रसाद बोर्डीकर यांनी मुलांप्रमाणे वाढविले. उच्च शिक्षणातून उत्कर्षाचे मार्ग खुले करून दिले. आज आम्ही आमच्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करतो आहोत. याचे कारण आईबाबांनी आमच्यावर केलेले संस्कार. शिस्त. शिक्षण. मुलीसुद्धा वंशाचा दिवा असतात. मुलगी झाली म्हणून दुःख व्यक्त करू नये. भ्रूणहत्या करू नये. मुलींवर विश्वास ठेवावा. त्यांना मुलांप्रमाणे वाढवावे. त्यांना विकासाची संधी उपलब्ध करून द्यावी. यावेळी शहरातील नागरिक उपस्थित होते. यांना मिळाला पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार दिलीप डासाळकर (पत्रकारिता), ह. भ. प. पंडित महाराज डाके (अध्यात्म), रमेश महाराज मोरे (अध्यात्म), गणेश माळवे (क्रीडा), डॉ. सुरेश हिवाळे (साहित्य), माधव गव्हाणे (शिक्षण), अरूणा थोरे (शेती), रवी कुलकर्णी, रवी मुळावेकर, प्रा. अनिल कुलकर्णी (नाट्य), डॉ. दिगंबर घोडके (वैद्यकीय) अशा अकरा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते 'सन्मान-कर्तृत्वाचा' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मातृगौरव पुरस्काराच्या मानपत्राचे वाचन बाबासाहेब हेलसकर यांनी केले.

## हिंगोलीत वाळू माफीयांचे धाबे दणाणले!

### वाळू तस्करी करणारा हायवा महसूल विभागाच्या जाळ्यात, १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली शहरातील खुशाल नगर भागात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनासह १५.१२ लाखांचा मुद्देमाल तहसीलदारांच्या पथकाने पकडला आहे. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात एका तरुणा विरुद्ध सोमवारी ता. २७ गुन्हा दाखल झाला आहे.




हिंगोली जिल्हाभरात वाळू घाटांवरून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईची धडक मोहिम हाती घेण्यात आली आहे. या सोबतच बाहेर जिल्ह्यातून विशेषतः नांदेड जिल्ह्यातून हिंगोली जिल्ह्यात वाळू घेऊन येणाऱ्या वाहनांवर महसूल विभागाने विशेष लक्ष केंद्रित केले असून या वाहनांवरही कारवाई केली जात आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदारांची पथके स्थापन केली आहेत. या शिवाय तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांची पथकेही कार्यरत आहेत. दरम्यान, सेनगाव भागातून एका वाहनामध्ये अवैधरित्या वाळू भरून वाहतूकल केली जात असून सदर वाहन हिंगोलीकडे येत असल्याची माहिती तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून भुजबळ यांच्या पथकाने सोमवारी सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास जवळा पळशी रोड भागातील खुशालनगर भागात थांबून वाहनांची तपासणी सुरु केली. यामध्ये एका हायवामध्ये अवैधरित्या वाळू वाहतूक होत असल्याचे दिसून आले. या पथकाने चालक सचिन सरकटे(रा. साबलखेडा,ता. सेनगाव) याच्याकडे चौकशी केली असता त्याच्याकडे वाळू वाहतुकीचा परवाना तसेच इतर कागदपत्रे आढळून आली नाही. त्यामुळे पथकाने सदर वाहन व वाळू जप्त केली आहे. या प्रकरणी तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्या तक्रारीवरून सचिन सरकटे याच्या विरुद्ध हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जमादार शेख पुढील तपास करीत आहेत.

## सुखना नदीतील अतिक्रमण हटवा:मनपा आयुक्तांचे आदेश

### संभाजीनगरात ५ जून रोजी नदीकाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणार

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांनी मंगळवारी सुखना नदी पुनर्जीवन प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी नदी पात्रातील अतिक्रमणे तात्काळ हटवण्याचे आणि ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नदीकाठावर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे निर्देश दिले. आयुक्तांनी नदी पात्रातील सर्व अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करण्याचे आदेश दिले. नदीपात्रात येणाऱ्या दुर्गंधीयुक्त पाण्याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हे सांडपाणी औद्योगिक क्षेत्रातून येत असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी समन्वय साधून त्यावर तात्काळ प्रतिबंध घालण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.ज्या ठिकाणी नागरिक ड्रेनेजचे पाणी थेट नदीपात्रात सोडत आहेत, त्याबाबतही तातडीने कार्यवाही करून नदीचे प्रदूषण थांबवण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. या स्थळ पाहणीच्या वेळी शहर अभियंता संजय कोंबडे, मुख्य उद्यान अधिकारी तथा सुखना नदी पुनर्जीवन प्रकल्प प्रमुख विजय पाटील, उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे, उपायुक्त अतिक्रमण निष्कासन विभाग सविता सोनवणे आणि सुखना नदी पुनर्जीवन प्रकल्प विशेष कार्य अधिकारी जयवंत कुलकर्णी उपस्थित होते.

## गोदा ते नर्मदा जलयात्रेचे बजाजनगरात स्वागत

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने जलसंवर्धनासाठी जनजागृती

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहरातील बजाजनगर ओएसिस चौकात 'गोदा ते नर्मदा - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' चे उत्साहात स्वागत करण्यात आले. जलसंवर्धनाबाबत जनजागृती करणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त ही ऐतिहासिक जलयात्रा आयोजित करण्यात आली आहे. श्रीक्षेत्र चोंडी, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून सुरू झालेली ही यात्रा महेश्वरपर्यंत प्रवास करणार आहे.

बजाजनगर येथील स्वागतावेळी यात्रा रथाचे आणि मंगल कलशाचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती सचिन गरड यांच्या




वतीने या भव्य स्वागताचे आयोजन करण्यात आले होते. आमदार गोपीचंद पडळकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित होते.

ही जलयात्रा त्यांच्या कार्याला उजाळा देऊन समाजात सकारात्मक बदल घडवेल आणि जनतेमध्ये जलसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करेल. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे, माजी आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार रामराव वडकुते, भाजपा जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते आणि छत्रपती संभाजीनगर भाजपा पश्चिम मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## आईला शिवी दिली म्हणून दगडाने चेहरा ठेचून हत्या

### गोंदेगाव येथे खून प्रकरणातील दोन आरोपी जेरबंद

जालना। प्रतिनिधी

एका जणांच्या आईला शिवी दिली म्हणून दगडांनी चेहरा ठेचून एकाची हत्या केली. ही जालना तालुक्यातील गोंदेगाव येथे घडली होती. या प्रकरणात दोन आरोपींना एलसीबी पथकाने आठ तासात जेरबंद केले आहे. मच्छिंद्र कोंडीबा दारडे (५५, पानेगाव) असे मयताचे नाव आहे. तर विनोद गोपीनाथ कुटे (२७, गोंदेगाव ह.मु. मोदीखाना, जालना), सोमीनाथ प्रकाश गिते (२७, देवगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी आरोपींची नावे आहेत. मयत रविवारी गोंदेगाव येथे नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी गेले होते. येत्या गावातच मुक्कामी होते. रात्रीच्या सुमारास त्यांची हत्या झाली होती.

घरी येऊन कपडे बदलले दोन्ही आरोपींनी खुन केल्यानंतर तेथून निघून गेले.

नंतर हे दोघेही जालना येथील मोदीखान्यातील विनोद कुटे याच्या घरी आले. कपड्याला रक्त लागलेले असल्याने पत्नीने रक्त का लागले असे विचारले असता, भांडण झाले आहे, असे म्हणून त्याने कपडे बदलले. आम्ही जाऊन येतो, सकाळी कपडे धुऊन टाक, असे सांगून दोघे निघून गेले. परंतू, सकाळच्या सुमारास पोलिसांनी घरी येऊन रक्ताने माखलेले कपडे ताब्यात घेतले.

## गोमाता संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

### करण्यासाठी विहीप संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी शहर व तालुक्यातील गोरक्षण संस्था गोरक्षण समिती विश्व हिंदू परिषद बजरंग दल व सकल हिंदू समाजाच्या वतीने गोमाता संरक्षण हक्कांविषयी तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले या निवेदनाद्वारे राज्यभर सुरू असलेल्या गोसंरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शवण्यात आला यावेळी दिपक महाराज काळे मुकुंद गर्जे गणेश जवरे बाळासाहेब गिते घनश्याम नाकिल भारत लिपारे शिवनाथ दगडखैर सोमनाथ बंग आशुतोष शर्मा नानासाहेब पालवे आदींसह शेकडो गोरक्षक व हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते निवेदनामध्ये गोसंरक्षण गोसंवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत गोवंशाचे असलेले महत्त्व अधोरेखित करण्यात आले शासनाने विद्यमान गोमाता हत्या बंदी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच जनजागृती आणि संवर्धनाच्या उपाययोजना अधिक बळकट कराव्यात अशी मागणी करण्यात आली पाथर्डी तालुक्यातील अवैध कत्तलखान्यावर शासनाने नजर ठेवून गोमातेचे व गोवंशाचे संरक्षण करावे गो हत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी व्हावी



गोहत्या बंदी कायदा आणखीन कडक करावा अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या यावेळी गोरक्षकांनी भजन संकिर्तन करत प्रशासनास निवेदन सादर केले गोमाता करे पुकार बंद करो अत्याचार गौमाता की जय आदी घोषणा देण्यात आल्या शहरातील स्व.वसंतराव नाईक चौकातून गोरक्षकांनी एकत्र जात तहसीलदार व प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले तहसील कार्यालयात प्रांतअधिकारी प्रसाद मते व तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांनी निवेदन स्वीकारले देशातील सुमारे ५५०० तहसीलदारांना एकाच वेळी या अभियानांतर्गत निवेदन देण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले पंतप्रधान गृहमंत्री राज्यपाल सर्व मुख्यमंत्र्यांनाही या अभियानांतर्गत निवेदन सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले सार्वजनिक आरोग्य स्थानिक भावना आणि कायदा-सुव्यवस्था लक्षात घेऊन प्रशासनाने विषयाची सकारात्मक दखल घ्यावी अशी विनंती करण्यात आली यावेळी विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.

## डाळिंबाची फळे तोडून फेकून दिली, शेडनेट फाडले

### घरातील लोक आखाडी पाहण्यास गेल्याची संधी साधली

अकोले। प्रतिनिधी

तालुक्यातील वीरगाव येथे अंबिका मातेचा यात्रोत्सव सुरू असतानाच, एका प्रगतशील शेतकऱ्याला अज्ञात समाजकंटकांनी लक्ष्य केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. देवठाण रोडवरील विठ्ठल श्रीपत कुमकर यांच्या शेतातील उभ्या डाळिंबाची नासधूस करून १० हजार बांबूंचा डेपो पेटवून देण्यात आला. या आगीत आणि नासधुशीत कुमकर यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

बुधवारी रात्री वीरगाव येथे यात्रेनिमित्त 'आखाडी'चा (दशावतार) कार्यक्रम होता. कुमकर आणि घरातील इतर सदस्य हा कार्यक्रम पाहण्यासाठी गेले होते. घरात केवळ त्यांच्या पत्नी आणि दोन लहान मुली होत्या. हीच संधी साधून माथेफिरूंनी रात्री १२ ते २ च्या सुमारास घरासमोर लावलेल्या बांबूंच्या ढिगाऱ्याला आग लावली. तसेच, शेतातील डाळिंबाची फळे तोडून फेकून दिली आणि शेडनेटचे आच्छादनही फाडून टाकले. याबाबत



अकोले पोलीस ठाण्यात व कृषी विभागास कळविण्यात आले आहे. शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान करणारे हे अज्ञात समाजकंटक आरोपींना शोधून गजाआड करण्याचे आव्हानात्मक काम पोलीस यंत्रणेकडून अपेक्षित आहे. पत्नी आणि मुलींच्या सतर्कतेने वाचले घर बांबू जळताना होणारा तडतड आवाज ऐकून कुमकर यांच्या पत्नी बाहेर आल्या, तेव्हा त्यांना आगीचे रौद्र रूप दिसले. त्यांनी तातडीने लहान मुलींना जागे केले आणि विठ्ठल कुमकर यांना फोन करून माहिती दिली. शेजारील पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांच्या मदतीने पाणी उपसा करून आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत बांबू जळून राख झाले होते.

# मजीप्रा सेवानिवृत्तांची पेन्शन रखडली वृद्ध व आजारी सेवानिवृत्त हवालदिल

## एप्रिल संपला तरी मार्चची पेन्शन नाही, ७ मे पर्यंत पेन्शन न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर ठिय्या

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन गेल्या सहा महिन्यांपासून अनियमितपणे मिळत असून, एप्रिल महिना संपत आला तरी मार्च २०२६ ची पेन्शन अद्याप जमा झालेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील अंदाजे ११००० महाराष्ट जीवन प्राधिकरण सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत.

२५ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालेले अनेक वयोवृद्ध व आजारी चतुर्थश्रेणी जलसेवक यांना पेन्शन उशिरा होत असल्याने सर्वाधिक फटका बसत आहे.एखादा सेवानिवृत्त कर्मचारी मयत झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना मिळणाऱ्या तुटपुंज्या कुटुंब निवृत्ती वेतनावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. आजारपण व औषधांचा खर्च वाढलेला असताना पेन्शनला उशीर झाल्यास त्यांची मोठी परवड होते. मात्र, मजीप्रा प्रशासन व महाराष्ट्र शासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करत आहे.



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवानिवृत्तांच्या वेतन व भत्त्याची हमी शासनाने दि. २३ मार्च २०१७ च्या जीआर नुसार घेतली होती. तेव्हापासून मागील वर्षापर्यंत पेन्शनबाबत अडचण आली नव्हती. परंतु गेल्या सहा महिन्यांपासून पेन्शनमध्ये अनियमितता येत आहे. या महिन्यात महालेखाकार यांनी लेखाशीर्षाला मुदतवाढ मिळाली नाही असे कारण देत पेन्शन अदा केली नाही. ३१ मार्च २०२५ रोजी संबंधित लेखाशीर्ष बंद झाल्याने निधी उपलब्ध होत नसल्याचे सांगण्यात येते पण यात सामान्य पेन्शन धारकांचा काय दोष या तांत्रिक बाबीचा त्वरित निपटारा होणे आवश्यक होते.महाराष्ट जीवन प्राधिकरण प्रशासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, वित्त विभाग आणि महालेखाकार यांच्यातील असमन्वयामुळे यात सामान्य सेवानिवृत्त भरडला जात आहे. या प्रकरणी न्यायालयाने प्रशासनाला अनेकदा फटकारले असूनही प्रशासन जाणीवपूर्वक पेन्शनसारख्या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करत आहे.

सेवानिवृत्तांचा इशारा.

पेन्शन हा शासनाच्या बजेटमधील अनिवार्य खर्च असूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने मजीप्रा सेवानिवृत्तांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. येत्या ७ मे पर्यंत मार्च व एप्रिल या दोन महिन्यांची पेन्शन अदा झाली नाही, तर वयोवृद्ध सेवानिवृत्त जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ◀◀ पान ३ वर



## जीवन प्राधिकरण पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या उपअभियंता पदी अक्षय नागरगोजे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, बीड विभागाच्या उप अभियंता पदी अक्षय अर्जुन नागरगोजे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अक्षय नागरगोजे यांनी आपल्या पदाचा कार्यभार मंगळवार दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी स्वीकारला.

अक्षय नागरगोजे हे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उपअभियंता (वर्ग-१) या पदावर अक्षय नागरगोजे यांची नियुक्ती झाली आहे. नागरगोजे हे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असून उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी संजय नागरगोजे यांचे ते पुतणे आहेत. राज्य शासनाच्या जल जीवन विभागाच्या अभियंता पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर अधिकारी यांनी कर्मचारी यांच्याकडून त्यांचे स्वागत करण्यात आले आहे.

# शिरूर (कासार) पोलिसांची मोठी कारवाई

## खुनाच्या गुन्ह्यातील ४ आरोपींना १२ तासांच्या आत अटक

शिरूर । प्रतिनिधी

नारायणगडाच्या पायथ्याशी झालेल्या सुमित सुशील गवते (वय १७) या तरुणाच्या खून प्रकरणाचा छडा लावण्यात शिरूर (कासार) पोलिसांना यश आले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी चक्रे फिरवत मुख्य दोन आरोपींसह दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना अवघ्या १२ तासांच्या आत जेरबंद केले आहे.



दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७:३० ते ८:३० च्या सुमारास बेलोरा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील हेलिपॅडच्या मोकळ्या जागेत ही घटना घडली. आरोपींनी पूर्ववैमनस्यातून किंवा जाणीवपूर्वक कट रचून सुमित गवते याचा खून केला होता. याप्रकरणी शिरूर (कासार) पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) आणि ६१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. ◀◀ पान ३ वर


# माजलगावमध्ये शेतकऱ्यांचा संताप; पिकविमा व खत दरवाढीविरोधात धरणे आंदोलनाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पिकविमा व रासायनिक खतांच्या वाढत्या दरांविरोधात शेतकरी आक्रमक झाले असून, गंगामसला शिवारात बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राज्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हेक्टरी १७,५०० रुपयांचा पिकविमा देण्याची घोषणा केली होती. मात्र, बीड जिल्हा या योजनेतून वगळण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

तसेच, रासायनिक खतांच्या किंमतीत सुमारे ८५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याने शेती खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असून, शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पिकविमा सरसकट हेक्टरी १७,५०० रुपये देण्यात यावा व खतांच्या किंमती तातडीने कमी करण्यात ◀◀ पान ३ वर



# आष्टी तालुक्यात दिवसाढवळ्या सोन्याची लूट; वृद्ध महिलेवर जीवघेणा हल्ला

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात दिवसाढवळ्या सोन्याच्या चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मंगळवारी दुपारी साडेतीन ते चारच्या सुमारास खानापूर येथे एक धक्कादायक घटना घडली. खानापूर येथील शेतामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिला छायाबाई संदीप तावरे यांच्यावर अज्ञात इसमाने निर्घृण हल्ला करत त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लुटून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर इसमाने तोंड बांधून हातात काठी घेऊन छायाबाई यांच्या डोक्यावर जबर मारहाण केली. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्या डोक्याला मोठा मार लागला आहे. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने अहिल्यानगर येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रविण क्षिरसागर यांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे. याबाबत माहिती देताना रवि घोलप यांनी सांगितले की, हल्लेखोर एकटाच होता आणि त्याने चेहरा झाकलेला होता. दरम्यान, जखमी छायाबाई यांनीही सांगितले की,एक इसम अचानक आला, त्याने काठीने डोक्यावर जोरदार मारहाण केली आणि गळ्यातील सोने हिसकावून पळ काढला.

तालुक्यात भीतीचे वातावरण

गेल्या काही महिन्यांपासून आष्टी तालुक्यात सोन्याच्या चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून दिवसाढवळ्या अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र भीती आणि संताप व्यक्त केला जात आहे. पोलीस प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करून आरोपींना जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बीडचा पारा ४३ अंशावर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये मंगळवारी उष्णतेने उच्चांक गाठला दुपारी दोन ते तीन च्या सुमारास बीडचा पारा ४३ अंशावर गेला. प्रचंड उष्णता वाढल्याने शहरांमध्ये रस्त्यावर शुकशुकाट जाणवत होता. विवाह प्रसंगावर याचा परिणाम होत उपस्थितांची संख्या घटली. बीड शहरांमध्ये दुपारच्या वेळी शहरांमध्ये रस्त्यावरची वर्दळ अत्यंत कमी झाली होती. तसेच शुभविवाह प्रसंगाला उपस्थित राहणारांची संख्या उन्हामुळे कमी झाली. उन्हाच्या तडाख्यात सापडले तर उष्माघात होण्याची शक्यता असल्याने लोकांनी खबरदारीचा उपाय म्हणून रस्त्यावर येणे टाळले.

# शिरूर तालुक्यातील पर्यवेक्षक व प्रगणकाचे प्रशिक्षण खोकरमोह येथे सुरू



शिरूर । प्रतिनिधी

भारताची जनगणना २०२७ च्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात मुख्य जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी बीड विवेक जॉनसन, जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय जनगणना अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आज शिरूर कासार तालुक्यातील पर्यवेक्षक व प्रगणक यांचे पहिले प्रशिक्षण सत्र जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा येथे सुरू झाले. शिरूर कासार तालुक्यामध्ये ग्रामीण भागाचे चार्ज अधिकारी सुरेश घोळवे तहसीलदार हे असून त्या अंतर्गत २२४ घरयादी गट निहाय प्रगलक नियुक्त केले असून त्यावर ३७ पर्यवेक्षकांची ◀◀ पान ३ वर

# महाराष्ट्र फर्टीलायझर्स डीलर व कृषी सेवा केंद्र चालक संघटनेचे बेमुदत बंद आंदोलन

पाथर्डी । प्रतिनिधी

महाराष्ट्र फर्टीलायझर्स डीलर्स असोसिएशन पुणे यांचेकडून राज्यातील कृषी सेवा केंद्र विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात बेमुदत बंद आंदोलनाची हात देण्यात आली आहे या अनुषंगाने पाथर्डी तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र चालकांनी दुकाने बंद ठेवत सरकारचा निषेध नोंदवला आहे या संदर्भात तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांना निवेदन देऊन आपल्या मागण्या शासनस्तरापर्यंत पोहोचाव्यात व मागण्या पूर्ण होईपर्यंत बेमुदत आंदोलन सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे खरवंडी कासार येथील संजय कीर्तने देविदास खेडकर किरण खेडकर तसेच अन्य कृषी केंद्र चालकांनी दुकाने बंद ठेवत सरकारचा निषेध नोंदवला आहे कृषी सेवा केंद्र चालकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये कंपन्याकडून रासायनिक खतांचा पुरवठा होणारे लिंकिंग बंद करावे शेजारील राज्यातून येणारे अप्रमानीत कापूस बियाणे शेतकरी हितार्थ प्रतिबंधित करावे सीलबंद पॅकिंग मध्ये विक्री केल्याने तपासणीत बियाणे खत नापास झाल्यास विक्रेत्यास आरोपी न ◀◀ पान ३ वर



# खत विक्रेत्यांच्या राज्यव्यापी बंदला बीडमध्ये उस्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

राज्यातील खत व बी बियाणे विक्रेत्यांवर लिंकिंग च्या नावाखाली कंपन्याकडून केली जाणार दडपशाही तसेच अप्रामाणित बियाणांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान यासंह इतर मागण्यांसाठी राज्यातील खत व बी बियाणे विक्रेत्यांनी राज्यव्यापी बंदची हाक दिली आहे.राज्याचे अध्यक्ष विनोद तराळ पाटील व महासचिव विपिन कासलीवाल यांच्या प्रमुख मार्गदर्शनामध्ये राज्यभर बंद पुकारण्यात आला आहे.



विशेषतः देशातील सर्व राज्य आज एक दिवसाचा सांकेतिक बंद ठेवून महाराष्ट्राच्या बंदला पाठिंबा दिला आहे.

वारंवार पाठपुरावा करूनही ठोस निर्णय नाही

विक्रेते व शेतकरी दोघांनाही तोटा होतं आहे.अन्यायकारक व अव्यवहार्य नियमांमुळे व्यवसायावर परिणाम होतं आहे.खत लिंकिंगमुळे शेतकऱ्यांवर अन्याय होतं आहे.अप्रमाणित बियाण्यांमुळे आर्थिक नुकसान होतं आहे.सीलबंद वस्तूंमध्ये दोष असतानाही विक्रेत्यांना आरोपी ठरवणे हा अन्याय आहे.तपासणी व प्रशासनातील अतिरेकी हस्तक्षेप कमी करून कंपन्यांची जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती बंद करावी.

लिंकिंग पूर्णतः बंद करण्यात यावे,अप्रमाणित बियाण्यांवर कठोर कारवाई ◀◀ पान ३ वर

# जिल्हा रुग्णालयात आरोपीचा मृत्यू

## दोशींवर कारवाईची अजिंक्य चांदणे यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

केज पोलीसांनी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केलेल्या तरुणाला जिल्हा रूग्णालयातील आरोपींच्या लॉकअपमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र आज सकाळी आरोपी आशिष धिवार याचा लॉकअपमध्येच मृत्यु झाल्याची घटना घडली आहे. दरम्यान या प्रकरणी डी पी आय चे प्रमुख अजिंक्य चांदणे यांनी दोशी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी जिल्हा शल्य चिकित्सक सोळंके यांच्याकडे केली आहे.



मयत आशिष धिवार

आशिष अशोक धिवार (वय २७) रा. काळेगाव घाट ता.केज याला केज पोलीसांनी पोक्सो अंतर्गत दाखल गुन्ह्यात अटक केली होती. सुरूवातीला त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयीन कोठडी झाल्याने त्याची रवानगी बीड जिल्हा कारागृहात करण्यात आली होती. काल सायंकाळी आशिष धिवार याची प्रकृती खालावल्याने त्याला जिल्हा रूग्णालयातील लॉकअप वार्डात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. काल सायंकाळी उशिरा त्याचे नातेवाईक त्याला भेटूनही गेले होते. मात्र आज सकाळी ८.१५ वाजण्याच्या सुमारास आरोपी आशिष धिवार याचा लॉकअपमध्येच मृत्यू झाल्याची घटना घडली. सदरील घटनेची माहिती कळताच नातेवाईकांसह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा रूग्णालयात धाव घेतली. डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी जिल्हा रूग्णालयाच्या कारभारासह केज पोलीसांनी केलेल्या मारहाणीवर संताप व्यक्त करत या प्रकरणात चौकशी करून जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भुमिका घेतली. केज पोलीसांनी पोलीस कोठडीत आशिष धिवार याला अतिशय अमानूषपणे मारहाण केली, घरापासून ते पोलीस ठाण्यापर्यंत त्याला मारहाण करत आणण्यात आल्याचे आशिषच्या भावाने सांगितल्याचा आरोप चांदणे यांनी केला आहे. दरम्यान अजिंक्य चांदणे यांनी दुपारी उशिरा शल्यचिकित्सक डॉ. सतिशकुमार सोळंके यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. जिल्हा रूग्णालयातील लॉकअपमध्ये योग्य उपचार न मिळाल्यामुळे आशिषचा मृत्यु झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. सदरील रूग्णाच्या नातेवाईकांना अरेरावीची भाषा करणारे डॉक्टर व नर्स यांच्या कारवाई झाली पाहिजे. लॉकअपच्या बाहेर असलेले सीसीटीव्ही बंद आहेत याची जबाबदारी कोणाची आहे? याचीही चौकशी करून तातडीने कारवाई करा अशी मागणी अजिंक्य चांदणे यांनी शल्यचिकित्सक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.




उस्मानाबादची शेळी सर्वत्र प्रसिद्ध आहे. बेरोजगारांना रोजगार मिळवून देणारा शेळीपालन एक प्रमुख उद्योग आहे. शेळीपालन उद्योग संघटीत पद्धतीने केल्यास ऊस कारखानदारीस स्पर्धा करू शकतो. तेव्हा संघटीत व्हा, शेळीपालन उद्योग सुरु करा, शासनाच्या योजना, कर्ज पुरवठा, व्यापार वृद्धीमधून शेळी कारखानदारी उभी करू या. संपूर्ण महाराष्ट्रात सभासद नोंदणी सेवा नि:शुल्क करू या, भेटा / लिहा / किंवा फोन कर.

डॉ.वसंतराव मुंडे, धाराशिव मोबाईल क्र.: 9422565365

* कार्यालय पत्ता *

उस्मानाबाद शेळी मार्केटींग सर्व्हिसेस धाराशिव,
नवीन पोलीस मुख्यालयासमोर डॉ. गपाट शेजारी धाराशिव.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात चीज नालॉगबाबत कडक नियम; बनावट पनीरविरोधात

**पुणे । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने सर्व रेस्टॉरंट, केटरर्स, हॉटेल्स व फास्ट फूड विक्रेत्यांना अन्नपदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या चीज नालॉगबाबत ग्राहकांना स्पष्ट माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ नुसार ग्राहकांना अन्नातील घटकांची अचूक माहिती मिळणे आवश्यक आहे. पनीर हे शुद्ध दुधापासून तयार होते, तर चीज नालॉग हे खाद्यतेल, स्टार्च व इतर घटकांपासून बनविलेले असल्याने त्याचे स्वरूप वेगळे असते. चीज नालॉग वापरून तयार केलेल्या पदार्थांची माहिती बिलावर नमूद करणे बंधनकारक आहे. मेन्यू कार्ड, इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवर स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे. उत्पादक व पुरवठादारांनी विक्री बिलावर डेअरी/चीज नालॉग असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे, असे एफडीएतर्फे नमूद करण्यात आले आहे.





पुणे विभागातील रेस्टॉरंट, केटरर्स, हॉटेल्स, फास्ट फूड विक्रेते तसेच चीज नालॉगचे उत्पादक, पनीरचे उत्पादक, पुरवठादार यांनी कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास त्यांच्यावर प्रशासनामार्फत अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६, नियम व नियमनेअंतर्गत संबंधितांवर कठोर कारवाई घेण्यात येईल. तसेच, ग्राहकांनी अशा प्रकारची दिशाभूल झाल्यास त्याबाबत तक्रार प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फी क्रमांकावर नोंदवावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त (अन्न) दिगंबर भोगावडे यांनी केले आहे.

ग्राहकांमध्ये चीज नालॉग (बनावट पनीर) ओळखण्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राज्याचा अन्न व औषध प्रशासन विभाग आणि दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाने संयुक्त मोहीम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे बाजारपेठांमधील बनावट पनीरच्या विक्रीस पायबंद बसून स्वतःहून ग्राहकच दुधापासूनचे पनीरची मागणी करतील, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. पनीर हा केवळ दुधापासून बनविलेला पदार्थ आहे. मात्र, काही रेस्टॉरंट, केटरर्स, हॉटेल्स, फास्ट फूड विक्रेत्यांकडे डेअरी नालॉग हा दुधाव्यतिरिक्त इतर खाद्यतेल, स्टार्च व इतर घटक वापरून बनविलेला पदार्थ ग्राहकांच्या गळ्यात मारला जात असल्याच्या तक्रारी आहेत. पनीरसारखा दिसतो, पण डेअरी नालॉग पनीर नसल्याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाने मार्गदर्शक तत्त्वे, सूचना व प्रसिद्धिपत्रकही जारी केले आहे. त्याद्वारे ग्राहकांमध्ये संयुक्तपणे जागरूकता निर्माण करण्यासाठी कल्याणकारी संघाचा आग्रह आहे.

या विषयावर सोमवारी (दि.२७) कल्याणकारी संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे मानद सचिव व ऊर्जा दूधचे संचालक प्रकाश कुतवळ, संगमनेरमधील राजहंस दूधचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, चितळे दूधचे निखिल चितळे, गोंविद दूधचे डॉ. संकपाळ, कन्हैया दूधचे मच्छिंद्र लंके, सोनाई दूधचे जोशी व अन्य प्रतिनिधींनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे पुणे विभागाचे सहआयुक्त (अन्न) दिगंबर भोगावडे यांची भेट घेऊन चर्चा केली आणि मागण्यांचे निवेदनही दिले.

बनावट पनीर ओळखण्याबाबत ग्राहकात जागरूकता निर्माण करणे, अन्न व्यावसायिकांमध्ये नियमांचे पालन सुनिश्चित करणे, सुरक्षित व दर्जेदार दुग्धजन्य पदार्थांची उपलब्धता वाढविणे यासाठी संयुक्त पातळीवर कार्य करण्यासाठी आज झालेल्या अन्न व औषध प्रशासन विभागातील संयुक्त बैठकीत काही सकारात्मक निर्णय घेतले आहेत. त्यासाठी लवकरच ग्राहकांमध्ये जनजागृती व अंमलबजावणीसाठी संयुक्त कार्यक्रम हाती घेतला जाईल.

# कांदा-बटाटा दर घसरणीचा फटका; बाजार समितीच्या उत्पन्नात घट

**पुणे । प्रतिनिधी**

कांदा, बटाटा आणि लसणाच्या उत्पादनात वाढ होऊन झालेल्या दर घसरणीचा परिणाम पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उलाढालीवर झाला आहे. मागील वर्षी कांदा, बटाटा आणि लसणाचे दर कमी राहिल्याने बाजार समितीच्या उलाढालीत तब्बल ५५० कोटींची घट झाली. गूळ-भुसार आणि फळविभाग वगळता बहुतांश विभागात समाधानकारक कामगिरी न झाल्याचा परिणामही यंदा दिसून आला. परिणामी, २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात बाजार समितीच्या एकूण उत्पन्नात ५ कोटी ४४ लाख २८ हजार १९७ रुपयांची घट झाल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

मागील वर्षीच्या तुलनेत गूळ-भुसार आणि फळविभाग वगळता कांदा, बटाटा आणि तरकारी विभागात यंदा उत्पन्नात घट झाली आहे. याखेरीज, बाजार शुल्क, स्थावर उत्पन्न, खडकी बाजार, मांजरी बाजार इतर उत्पन्नातही काही प्रमाणात घट झाली आहे. या सर्वांचा परिणाम एकूण उत्पन्नावर झाला आहे.

कांदा, बटाटा विभागात सर्वाधिक ६ कोटी २४ लाख २९ हजारांची घट आहे. बाजार शुल्कात ४ कोटी २२ लाख १२ हजार १८९ रुपये, स्थावर उत्पन्नात ९ लाख ७० हजार रुपये, गुंतवणुकीवरील व्याजात १ कोटी १३ लाख ७७ हजार ७५४ रुपये,




इत्तर उत्पन्नात ३ लाख ६८ हजार ४३४ रुपये, जनावरांच्या बाजारात ५९ हजार ९८५ रुपये, मांजरी बाजार ४१ लाख ३ हजार ६४९, खडकी बाजार ३ लाख ८४ हजार ५५४ रुपये,

उत्तमनगर येथील बाजाराच्या उत्पन्नात ९ हजार ५०६ रुपयांची घट अशी एकूण उत्पन्नात ५ कोटी ४४ लाख २८ हजार १९७ रुपयांची घट झाली असल्याचे बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांनी सांगितले. या वेळी सभापती प्रकाश जगताप, माजी उपसभापती शशिकांत गायकवाड, सहसचिव घनश्याम जेधे आदी उपस्थित होते. हंगामात काही काळ दर वाढतात, तर काही काळ कमी होतात. मात्र, मागील आर्थिक वर्षात कांदा-बटाटा आणि लसणाचे दर एकदाही वाढले नाहीत. उलट नेहमीच्या तुलनेत दर कमी राहिले. त्यामुळे कांदा, बटाटा विभागातील उत्पन्नात घट झाली. अन्य विभागातही घट झाली असून, चालू वर्षांत उत्पन्नवाढीसाठी विशेष प्रयत्न करू.

# संतापजनक! बँकेच्या एजंटकडून कर्जदार दाम्पत्यास लाथा-बुक्क्यांनी मारहाण, पुण्यात कायदा-व्यवस्थेचे धिंदवडे

**पुणे । प्रतिनिधी**

बँकांमधून कर्ज घेतलेल्या कर्जदारांना बँका (इरपज्ञ) आणि वसुली अधिकारी, एजंटकडून नेहमीच तगादा लावला जातो. काही आर्थिक अडचणींमुळे कर्जाचे हफ्ते थकल्यानंतर किंवा उशीर झाल्यानंतर बँक कर्मचारी सावकारी पाशा दाखवत कर्जदारांना अरेरावीची भाषा करतात, अनेकदा संबंधित कर्जदाराकडील काही वस्तूही उचलून नेल्या जातात. तर, कधी मारहाणीची देखील घटना घडते. पुण्यातील (झींपश) हडपसरमध्ये अशीच मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून या घटनेचा



व्हिडिओ (ींळीरश्र ींळवशे) देखील व्हायरल झाला आहे. हडपसर येथील एका व्यक्तीला भररस्त्यात बँकेचे वसूली एजंट घेरुन मारहाण करतात, असे म्हणत खासदार अमोल कोल्हेंनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केला आहे.

अमोल कोल्हे यांनी संबंधित घटनेचा व्हिडिओ आपल्या ट्विटर हँडलवरुन शेअर करत गृह विभागाने घटनेची नोंद घेऊन कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. रिझर्व्ह बँकेने स्पष्टपणे नमूद केले आहे की, वसुली एजंट कर्जदाराला केवळ सकाळी ७ ते संध्याकाळी ७ या वेळेतच फोन करू शकतात किंवा भेटू शकतात. एजंटांनी कोणत्याही परिस्थितीत शारीरिक किंवा मानसिक छळ, अपमान किंवा मारहाण करणे हा गंभीर गुन्हा आहे. कर्जदाराच्या थकबाकीची माहिती त्याच्या शेजाऱ्यांना किंवा मित्रांना देऊन त्याची बदनामी करता येत नाही, अशी माहिती खासदार कोल्हे यांनी आपल्या पोस्टमधून दिली. रिझर्व्ह बँकेचा संदर्भ देत अमोल कोल्हे म्हणाले की, वसुलीसाठी येणाऱ्या व्यक्तीकडे बँकेने दिलेले अधिकृत ओळखपत्र आणि अधिकृत पत्र असणे अनिवार्य आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने देखील स्पष्ट केले आहे की, बँका केवळ गुंडांच्या जोरावर कर्जाची वसुली करू शकत नाहीत. जर बँकेच्या एजंटने कायद्याचे उल्लंघन केले, तर त्यासाठी संबंधित बँकेला जबाबदार धरले जाईल, असेही अमोल कोल्हेंनी म्हटले.

# पुण्यातील जुन्नरमध्ये उष्माघातानं महिलेचा मृत्यू, शेतात काम करताना झाला दुर्दैवी अंत

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. राज्यात अनेक ठिकाणी तापमान ४० अंशाच्या पुढे गेलं आहे. तर काही ठिकाणी तापमान ४५ ते ४६ अंशावर गेलं आहे. त्यामुळं नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उष्माघातामुळं काही ठिकाणी नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अशातच पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात उष्माघाताचा बळी गेला आहे. शेतात काम करताना कष्टकरी महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

जुन्नर तालुक्यात उष्णतेचा वाढता तडाखा आता जीवघेणा ठरतोय

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात उष्णतेचा वाढता तडाखा आता जीवघेणा ठरत असल्याचं समोर आलं आहे. निमगाव सावा येथे शेतात काम करत असताना एका कष्टकरी महिलेचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची



धक्कादायक घटना घडली आहे. जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा गावमाळा परिसरातील रुपाली गाडगे या आज सकाळच्या सुमारास शेतात खुरपणीचे काम करत होत्या. याचवेळी अचानक त्यांना उष्माघाताचा त्रास झाला आणि त्यांची प्रकृती झपाट्याने खालावली. घटनेनंतर स्थानिकांनी तातडीने मदतीचा प्रयत्न केला. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. हे पाहता उष्माघाताने त्यांचा जीव गेल्याचं बोललं जात आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारच्या वेळेत कष्टाची कामे टाळावीत, पुरेसे पाणी प्यावे आणि स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

लातूर जिल्ह्यात उष्माघातामुळं तीन जणांचा मृत्यू

लातूर जिल्ह्यात उष्माघाताच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. औसा तालुक्यातील एरंडी गावात तीव्र उन्हामुळे २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. महेश लिंबाजी इंगोले असं या तरुणाचं नाव आहे. यामुळं परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत तरुणाचे नाव महेश लिंबाजी इंगोले असे आहे. तो शेतातील काम आटोपून घरी परतल्यानंतर अचानक त्याला चक्कर आली आणि तो खाली कोसळला.

# पुण्यातील जुन्नरमध्ये मोठी दुर्घटना! शेततळ्यात बुडून दोन चिमुकले दगावले; गावावर शोककळा, कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर

**पुणे । प्रतिनिधी**

खेळता खेळता मृत्यूने घाला घातल्याची एक भीषण घटना पुणे (झींपश) जिल्ह्यातील जुन्नर (र्गींपपरी) तालुक्यातील बल्लाळवाडी येथे घडली आहे. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दोन चिमुकल्यांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



नेमकी घटना काय?

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बल्लाळवाडी येथील गाडेकर यांच्या शेतात असलेल्या शेततळ्यापाशी ही मुले खेळत होती. खेळत असताना त्यांचा अंदाज चुकला आणि ती तळ्यात पडली. बराच वेळ मुले घरी न आल्याने शोधाशोध सुरू झाली असता ही धक्कादायक बाब उघडकीस आली. मृत मुलांची आडनावे पवार आणि नवले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

रेस्क्यू टीमने बाहेर काढले मृतदेह

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. तत्काळ पोलीस आणि स्थानिक रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. रेस्क्यू टीमने शर्थीचे प्रयत्न करून दोन्ही मुलांचे मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे बल्लाळवाडी परिसरात नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

शेततळ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

ग्रामीण भागात शेतीसाठी शेततळी वरदान ठरत असली तरी, अनेकदा सुरक्षिततेच्या कारणास्तव ती जीवघेणी ठरत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. शेततळ्यांना संरक्षक जाळी किंवा कुंपण नसल्याने अशा दुर्घटना वारंवार घडत असून, प्रशासनाने आणि शेतकरी बांधवांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# लग्नास नकार; तरुणीचा पाठलाग करत जीवे मारण्याची धमकी

**पुणे । प्रतिनिधी**

तरुणीने लग्नासाठी नाही म्हटल्याचा राग मनात धरून तरुणीचा पाठलाग करून तिला व तिच्या कुटुंबीयांना जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच तिला, 'तू माझी नाही झालीस, तर कुणाचीच होऊ देणार नाही,' अशी धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी ३० वर्षीय पीडित तरुणीने फिर्याद दिली आहे. आरोपीने तिचा वारंवार पाठलाग करून तिला मानसिक त्रास दिला. जानेवारी २०२६ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत हा प्रकार घडला. आरोपीने पीडितेचा वारंवार पाठलाग केला आणि तिच्या घरात शिरून तिला मारहाण केली. 'जर तू माझी झाली नाहीस, तर मी तुला कुणाचीच होऊ देणार नाही आणि तुम्हाला जिवंत सोडणार नाही,' अशी धमकी त्याने दिली. तसेच, आरोपीने पीडितेच्या आईलाही शिवीगाळ केली असून, वारंवार फोन करून तिचा छळ केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रसाद जाधव करीत आहेत.

# बारावीचा निकाल ४ मेनंतर; विद्यार्थ्यांची प्रतीक्षा वाढली

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्याची जय्यत तयारी करण्यात आली असून, येत्या ४ मेनंतर कधीही निकाल जाहीर केला जाणार असल्याची माहिती राज्य मंडळातील विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे१० फेबुवारी ते १८ मार्चदरम्यान बारावीची परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी १० हजार ६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत बारावीची विद्यार्थिसंख्या सुमारे २७ हजारांनी वाढली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य मंडळाकडून बारावीचा निकाल तयार करण्याचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आहे. येत्या ३० एप्रिलला निकाल लावण्याची तयारी राज्य मंडळाने केली होती. परंतु, काही तांत्रिक कारणास्तव हा निकाल पुढे जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि पुढे शनिवार, रविवार आल्यामुळे ४ मे नंतर निकाल जाहीर करण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे एकतर ३० एप्रिल किंवा ४ मेनंतर राज्य मंडळाच्या बारावीचा निकाल कधीही जाहीर केला जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य मंडळांचे कर्मचारी संपाच्या तयारीत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ही संस्था स्वायत्त असल्यामुळे संबंधित संस्थेने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या बदली तसेच पदोन्नतीसंदर्भात एक नियमावली तयार केली होती. त्यानुसारच संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या बदली आणि पदोन्नती होत होत्या. परंतु, राज्य शासनाने आता शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती आणि बदलीसाठी एक नवीन नियमावली जाहीर केली आहे. या नियमावलीच्या विरोधात आणि समर्थनार्थ असे दोन गट राज्य मंडळात तयार झाले असून, त्यातील नियमावलीच्या विरोधात असलेल्या गटाने लेखणीबंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांनी जर आंदोलन सुरू केले तर त्याचा थेट फटका दहावी-बारावीच्या निकालाला बसणार असल्याची माहिती देखील संबंधित सूत्रांनी दिली आहे. गेल्या वर्षी ५ मे रोजी जाहीर करण्यात आला होता निकाल

राज्य मंडळाने गेल्या वर्षी ५ मे २०२५ ला बारावीचा निकाल जाहीर केला होता. त्यामुळे यंदा देखील ५ मे २०२६ ला निकाल जाहीर होणार की निकालाची तारीख पुढे जाणार, याकडे विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष लागले आहे.

# संतापजनक! बँकेच्या एजंटकडून कर्जदार दाम्पत्यास लाथा-बुक्क्यांनी मारहाण, पुण्यात कायदा-व्यवस्थेचे

**पुणे । प्रतिनिधी**

बँकांमधून कर्ज घेतलेल्या कर्जदारांना बँका (इरपज्ञ) आणि वसुली अधिकारी, एजंटकडून नेहमीच तगादा लावला जातो. काही आर्थिक अडचणींमुळे कर्जाचे हफ्ते थकल्यानंतर किंवा उशीर झाल्यानंतर बँक कर्मचारी सावकारी पाशा दाखवत कर्जदारांना अरेरावीची भाषा करतात, अनेकदा संबंधित कर्जदाराकडील काही वस्तूही उचलून नेल्या जातात. तर, कधी मारहाणीची देखील घटना घडते. पुण्यातील (झींपश) हडपसरमध्ये अशीच मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून या घटनेचा व्हिडिओ (ींळीरश्र ींळवशे) देखील व्हायरल झाला आहे. हडपसर येथील एका व्यक्तीला भररस्त्यात बँकेचे वसूली एजंट घेरुन मारहाण करतात, असे म्हणत खासदार अमोल कोल्हेंनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केला आहे.

अमोल कोल्हे यांनी संबंधित घटनेचा व्हिडिओ आपल्या ट्विटर हँडलवरुन शेअर करत गृह विभागाने घटनेची नोंद घेऊन कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. रिझर्व्ह बँकेने स्पष्टपणे नमूद केले आहे की, वसुली एजंट कर्जदाराला केवळ सकाळी ७ ते संध्याकाळी ७ या वेळेतच फोन करू शकतात किंवा भेटू शकतात. एजंटांनी कोणत्याही परिस्थितीत शारीरिक किंवा मानसिक छळ, अपमान किंवा मारहाण करणे हा गंभीर गुन्हा आहे. कर्जदाराच्या थकबाकीची माहिती त्याच्या शेजाऱ्यांना किंवा मित्रांना देऊन त्याची बदनामी करता येत नाही, अशी माहिती खासदार कोल्हे यांनी आपल्या पोस्टमधून दिली.

रिझर्व्ह बँकेचा संदर्भ देत अमोल कोल्हे म्हणाले की, वसुलीसाठी येणाऱ्या व्यक्तीकडे बँकेने दिलेले अधिकृत ओळखपत्र आणि अधिकृत पत्र असणे अनिवार्य आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने देखील स्पष्ट केले आहे की, बँका केवळ गुंडांच्या जोरावर कर्जाची वसुली करू शकत नाहीत. जर बँकेच्या एजंटने कायद्याचे उल्लंघन केले, तर त्यासाठी संबंधित बँकेला जबाबदार धरले जाईल, असेही अमोल कोल्हेंनी म्हटले.



गृह विभागाने गांभीर्याने दखल घ्यावी - कोल्हे

दरम्यान, या सगळ्या गोष्टी धाब्यावर बसवून हडपसरमध्ये ही मारहाण झाली. राज्यात कायदा सुव्यवस्था अस्तित्वात आहे की नाही, याबाबत शंका यावी अशी ही घटना आहे. राज्याच्या गृहखात्याने या घटनेची गांभीर्याने नोंद घ्यावी.

# पुण्यातील बुधवार पेठेत पोलिसांची कारवाई, ४ फ्लॅट सील; ३ बांगलादेशी महिलांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील बुधवार पेठ (झींपश) परिसरात कुंटणखान्यासाठी वापरण्यात आलेल्या न्यु वेलकम, बेगम, दाणे आळी येथील जुना वाडा या बिल्डींगमधील काही फ्लॅट सिल करण्यात आले आहेत. याप्रकरणी, भारतात अनाधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या ३ बांगलादेशी महिलांना फरासखाना पोलिसांनी पकडले. फरासखाना पोलीस स्टेशन (झेश्रळलश) येथे अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंध पोक्सो गुन्हा दाखल आहे. फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीत सदर दाखल गुन्ह्यामध्ये कुंटणखाना चालविणारे, तसेच जागा उपलब्ध करुन देणाऱ्यांचा तपास करीत असतांना बिल्डींगमधील कुंटणखान्यासाठी (झीींळींीश) वापरलेले फ्लॅट सिल करण्यात आले आहेत. या कारवाईत एकूण ४ फ्लॅट १ वर्षाकरीता सीलबंद करण्यात आलेले आहे.

महिनाभरापूर्वी ३ बांग्लादेशी महिला अनाधिकृत विनापरवाना भारतात वास्तव्य करीत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी बुधवार पेठ येथील सार्वजनिक रोडवर छापा टाकत कारवाई केली होती. या कारवाई बांगलादेशी महिला नामे १) जोशना शकुर अली २) कलसुम खातून आणि ३) अंजुरा बेगम सर्व (राहणार बांग्लादेश) मिळून आल्यानंतर,



त्यांची सखोल चौकशी करण्यात आली. सदर महिला भारतात अनाधिकृतपणे छुप्या पद्धतीने एक महिन्यापासून वास्तव्य करीत होत्या. विशेष म्हणजे, त्या बांगलादेशी महिला पुणे येथे वेश्या व्यवसाय करुन, स्वतः चा उदरनिर्वाह करीत असल्याबाबतची माहिती समोर आलेली आहे. पोलिसांना त्याच्याकडे बांगलादेशी असल्याचे पुरावे प्राप्त झाल्यामुळे त्यांना ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात आल्याची माहिती आहे.

४ कुंटणखाने सील, एजंटवरही कारवाई - रावले

सध्या पुणे शहरात वास्तव्यास असलेले बांगलादेशी नागरिक शोधण्याचे काम सुरू आहे. बांगलादेशी महिला ज्या पुण्यात राहतात त्यांनाही शोधण्याचे काम सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून काही बांगलादेशी महिलांना शोधून काढलं होतं. शहरातील काही भाग आहे, काही बिल्डिंग आहे, तिकडे या महिला ठेवण्यात येतात. आज चार कुंटणखाने सील केले आहेत, अशी माहिती झोन १ चे पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले यांनी दिली. एजंटांकडून इकडे महिलांना आणले जाते, काही एजंटवर कारवाईचे काम सुरू आहे. वेगवेगळ्या कारणाने बांगलादेशी इथ येत आहेत. गेल्या काही महिन्यात ४० पेक्षा जास्त बांगलादेशी पकडण्यात आले आहेत. स्थानिक लोकांच्या मदतीने इथ येतात, त्यांच्यावर कारवाई करून गुन्हे दाखल केले आहेत. जे रॅकेट आहे, त्यावर कारवाई केली जात असल्याचंही रावले यांनी सांगितलं.